# अधिसंघ संस्थापन लेख

आणि

# संस्थापन नियमावली


महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास
महामंडळ मर्यादित

(महाराष्ट्र शासन अंगीकृत)

सत्यमेव जयते

# निगमन प्रमाणपत्र

## १९७७ - ७८ चा क्रमांक १९८८२

मी, याद्वारे प्रमाणित करतो की, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित हे, कंपन्यांबाबत अधिनियम, १९५६ (१९५६च्या अधिनियम क्रमांक १) याद्वारे आज निगमित करण्यात आले आहे आणि ती मर्यादित कंपनी आहे.

सव्वीस सप्टेंबर एकोणीसशे सत्याहत्तर रोजी मुंबई येथे माझ्या सहीने दिले.

डी. जे विश्वास,

कंपनी निबंधक,
महाराष्ट्र

मुद्रा

कंपनी निबंधक, महाराष्ट्र
यांचीमुद्रा

# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, याचा अधिसंघ संस्थापना लेख

**एक.** या कंपनीचे नाव महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित असे आहे.

**दोन.** कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय महाराष्ट्र राज्यात असेल.

**तीन.** कंपनी ज्या उद्दिष्टांसाठी स्थापना करण्यात आली ती उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

**अ. कंपनी कायद्याने निगमित झाल्यानंतर पुढील प्रमुख उद्दिष्टांसाठी प्रयत्नशील राहील:**

१. सिनेमा, नाट्यकला व तमाशासह लोककला, संगीत, नृत्य आणि इतर प्रयोगनिष्ठा कला, या क्षेत्रामधील सांस्कृतिक कार्यक्रमांना मदत देणे, सहाय्य करणे, संरक्षण देणे, ते आयोजित करणे, सुरू करणे, त्यांची वाढ करणे आणि त्यांची गती वाढविणे.

२. सर्वसाधारणपणे चित्रपटांचां आणि विशेषत: मराठी चित्रपटांचा विकास करणे, त्याला मदत देणे, सहाय्य करणे, ते सुरू करणे, वाढविणे आणि त्यांची निर्मिती, वितरण व प्रदर्शन यासाठी अर्थसहाय्य देणे तसेच विशेष अनुकूल अटींवर सहाय्य देणे आणि इतर भाषांतील चित्रपटांसाठी याच प्रकारे मदत करणे.

३. महत्त्वाच्या शहरांमध्ये प्रथम प्रदर्शित करण्यासाठी (फर्स्ट रन) चित्रपटगृहांसारख्या, नाट्यगृहांसारख्या वाणिज्यिक तत्त्वावरील योग्य आनुषंगिक सोयी पुरवून महाराष्ट्रातील रंगभूमीला व प्रयोगनिष्ठ कलांना मदत देणे, सहाय्य करणे, त्यांची वाढ करणे, त्यांचे आयोजन करणे, त्या सुरू करणे आणि त्यांचा विकास करणे.

४. चित्रपट नगरी सुरू करणे, त्यांचा विकास करणे, त्यांची देखभाल करणे, विस्तार करणे, त्यांचे आधुनिकीकरण करणे, व्यवस्था ठेवणे व त्या व्यापारी तत्त्वावर चालविणे आणि गोरेगाव, मुंबई येथील विद्यमान चित्रपटनगरी ताब्यात घेणे व तिची व्यवस्था ठेवणे.

**ब. मुख्य उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आनुषंगिक किंवा सहाय्यभूत उद्दिष्टे :**

५. नाट्यगृहे, पूर्वप्रयोग (प्री-व्यू) नाट्यगृहे, फिरती अर्धकायम नाट्यगृहे, स्टुडिओ, संगीत शाळा, प्रेक्षागृहे, इ. यांसह चित्रपटगृहे बांधण्याचे काम स्वत: करणे आणि प्रयोजनासाठी योग्य उपक्रम परिचालकांना किंवा संघटनांना अर्थसहाय्य देऊन त्या गोष्टींना चालना देणे आणि विद्यमान स्टुडिओ, नाट्यगृहे इत्यादी यात, एकतर स्वत:च किंवा योग्य त्या उपक्रम परिचालकांना

किंवा संघटनांना त्या प्रयोजनासाठी अर्थ सहाय्य देऊन, फेरफार करणे, त्यांचे आधुनिकीकरण करणे, त्यांचे पुनर्नवीकरण करणे, त्यात दुरुस्त्या करणे आणि त्यांमधील साधनसामग्री पुन्हा बसविणे.

६. संग्रहालये, अभिलेखागारे, संशोधन केंद्रे, चित्रपट, संगीत व नृत्य अकादमी, ग्रंथालये, चित्रपट टेप संग्रहालये, प्रयोगशाळा स्थापन करणे आणि त्यांची देखभाल करणे आणि महाराष्ट्रात लोककला व नाट्यकला आणि संगीत व नृत्य यांसह प्रयोगनिष्ठ कला यांच्याविषयीची आवड टिकवून ठेवणे आणि त्याबाबतचे संशोधन व अभ्यास यांस प्रोत्साहन देणे आणि सर्वसाधारणपणे, महाराष्ट्रात प्रयोगनिष्ठ कला आणि चित्रपट यांच्या संशोधनाच्या व विकासकाच्या क्षेत्रातील सर्व आवश्यक ती कामे हाती घेणे.

७. चित्रपट महोत्सव, नाट्य महोत्सव, संगीत व नृत्य संमेलने आणि तसेच लोककला महोत्सव आयोजित करणे व ते संघटित करणे.

८. उपक्रम परिचालकांना (enterpreneurs) त्यांचे चित्रपट परदेशात पाठवण्याबाबत एजन्सी तत्त्वावर किंवा योग्य त्या शर्तीवर सहाय्य करणे, मार्गदर्शन करणे आणि सल्ला देणे.

९. राज्य शासन किंवा केंद्र शासन हस्तांतरित करील अशा चित्रपट, रंगभूमी आणि संस्कृति यांच्या विकासाशी संबंधित अशा योजना हाती घेणे आणि अंमलात आणणे.

१०. चित्रपट आणि रंगभूमी उद्योगासाठी योग्य ती यंत्रसामग्री, साधनसामग्री आणि उपसाधने मिळवण्यासाठी तसेच चित्रपट निर्मिती आणि मराठी रंगभूमी आणि प्रयोगनिष्ठ कला या दोन्हीसाठी भाडे खरेदी बाबतच्या सोयी पुरवण्यासाठी सहाय्य करणे, मार्गदर्शन करणे व सल्ला देणे.

११. संस्करण प्रयोगशाळा, संस्करण गृहे, संस्करण संयंत्रे स्वत:हून स्थापन करणे आणि चालविणे आणि सामायिक सुविधा केंद्रांसारख्या सुविधा स्वत:हून पुरविणे किंवा योग्य उपक्रम परिचालकांमार्फत किंवा संघटनांमार्फत या कामांसाठी सहाय्य करणे.

१२. मराठी चित्रपट उद्योगाला विशेष अनुकूल अटींवर सहाय्य देऊन त्या उद्योगाची जपणूक आणि विकास करण्यासाठी विशेष उपाय योजणे.

१३. सर्वसाधारणपणे महाराष्ट्रातील चित्रपट आणि नाट्य क्षेत्रातील सर्व शाखांमध्ये आणि विशेषत: मराठी चित्रपट, संगीत, नृत्य यांसह महाराष्ट्राच्या प्रयोगनिष्ठ कलांमध्ये प्रशिक्षण देण्यासाठी सांस्कृतिक केंद्रे स्थापन करणे.



१४. महाराष्ट्रातील मराठी चित्रपट व रंगभूमी या क्षेत्रातील लायक आणि प्रथितयश कलाकारांना चरितार्थाकरिता सहाय्य देण्यासाठी योजना तयार करणे व त्या राबविणे, आणि तसेच, महाराष्ट्रातील मराठी चित्रपट, रंगभूमी आणि महाराष्ट्रातील प्रयोगनिष्ठ कला यांची वाढ आणि प्रगती होण्यासाठी झटणाऱ्या महाराष्ट्रातील लायक संस्थांना सहाय्य देण्यासाठी योजना तयार करणे व त्या राबविणे.

१५. भारत सरकारच्या सांस्कृतिक देवाण-घेवाणीच्या कार्यक्रमांमध्ये भाग घेणे.

१६. सर्वथा किंवा काही प्रमाणात या कंपनीसारखीच उद्दिष्टे असणाऱ्या किंवा चित्रपट, नाट्यकला, लोककला आणि इतर प्रयोगनिष्ठ कला यांच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही कंपनीने किंवा निगम निकायाने किंवा अनिगम निकायाने किंवा एखाद्या व्यक्तीने किंवा संस्थेने काढलेले किंवा हमी दिलेले शेअर (भाग), रोखे, ऋणपत्रे, ऋणपत्र-रोखे, बंधपत्रे, दायित्वे आणि कर्जरोखे खरेदी करणे, त्यांना हमी देणे, त्यात गुंतवणूक करणे, ते संपादन करणे आणि धारण करणे.

१७. एखाद्या कंपनीने निगम निकामाने किंवा अनिगम निकामाने काढलेले कोणतेही शेअर, रोखे, ऋणपत्रे, ऋणपत्र-रोखे, बंधपत्रे, दायित्वे किंवा कर्ज रोखे मूळ वर्गणीद्वारे, व्यवसाय संघात भाग घेऊन, निविदेद्वारे खरेदी करून विनिमय करून किंवा अन्य प्रकारे संपादन करणे आणि त्यामध्ये सशर्त किंवा अन्य प्रकारे अंशदान करणे आणि त्याच्या वर्गणीची हमी देणे आणि त्याच्या मालकीमुळे आणि तिला आनुषंगिक म्हणून देण्यात आलेले सर्व हक्क व अधिकारांचा वापर करणे व ते अंमलात आणणे.

१८. चित्रपट, नाट्यकला, लोककला आणि इतर प्रयोगनिष्ठ कला यांच्या क्षेत्राशी संबंधित असलेल्या किंवा सर्वथा किंवा काही प्रमाणात या कंपनीसारखीच उद्दिष्टे असलेल्या कोणत्याही कंपनीच्या किंवा उपक्रमाच्या घडणीत, व्यवस्थापनात, देखरेखीत, तिच्या कामकाजाच्या नियंत्रणात किंवा कार्यात भाग घेणे आणि त्या प्रयोजनासाठी तांत्रिक आणि व्यवस्थापन विषयक सेवा देणे आणि प्रशासक म्हणून किंवा इतर कोणत्याही नात्याने काम करणे आणि कोणतेही संचालक, प्रशासक, व्यवस्थापक किंवा लेखापाल किंवा इतर तज्ञ किंव एजंट यांची नेमणूक करणे आणि त्यांना पारिश्रमिक देणे आणि अशी कंपनी किंवा उपक्रम यांच्या व्यवस्थापन एजंटांना देय असलेल्या पारिश्रमिकाला हातभार लावणे.

१९. पैसे, अनुदाने, अर्थसहाय्य, देणग्या, भाग किंवा ठेवी, सशर्त किंवा अन्य प्रकारे नियत व्याजासह किंवा त्या शिवाय स्वीकारणे.

२०. कंपनीच्या वतीने प्रतिभूती (securities) धारण करण्यासाठी आणि कंपनीच्या हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी विश्वस्ताची (व्यक्ती किंवा निगम) नेमणूक करणे.

२१. कायम स्वरूपाचे किंवा परिवर्तनशील स्वरूपाचे शेअर किंवा कर्ज रोखे किंवा युनिट ट्रस्ट यात वाढ करणे, ते संघटित करणे, त्यांची व्यवस्था ठेवणे, ते धारण करणे, निकालात काढणे किंवा त्यांच्या संबंधातली कार्यवाही करणे.

२२. कंपनीने संपादन केलेल्या कोणत्याही मालमत्तेसाठी किंवा अधिकारासाठी, एकतर रोख किंवा पूर्णत: किंवा अंशत: प्रदान करण्यात आलेल्या शेअरद्वारे किंवा कर्ज रोखे काढून किंवा एका प्रकाराने काही प्रमाणात आणि दुसऱ्या प्रकाराने काही प्रमाणात अशा प्रकारे आणि सर्वसाधारणपणे निर्धारित करण्यात येतील अशा शर्तींवर पैसे देणे.

२३. चित्रपट, नाट्यकला, लोककला आणि इतर प्रयोगनिष्ठ कला या क्षेत्रातील सांस्कृतिक कार्यक्रमांशी संलग्न असलेल्या किंवा सर्वथा किंवा काही प्रमाणात या कंपनीसारखीच उद्दिष्टे असणाऱ्या कोणत्याही कंपनीशी, संघटनेशी किंवा व्यक्तीशी मिलाफ करणे, भागीदारी किंवा कोणतेही सामायिक धन (purse) किंवा नफ्याच्या वाटणी व्यवस्थेमध्ये भाग घेणे, किंवा तिच्याशी सहकार्य करणे किंवा कोणत्याही मार्गाने अर्थसहाय्य देणे किंवा सहाय्य देणे.

२४. कंपनीला योग्य वाटेल अशा मोबदल्यासाठी आणि विशेषत: या कंपन्यांशी सर्वथा किंवा काही प्रमाणात सारखी उद्दिष्टे असणाऱ्या इतर कोणत्याही कंपनीचे शेअर, ऋणपत्रे किंवा कर्ज रोखे यासाठी, कंपनीचा उपक्रम किंवा त्याचा कोणताही भाग विकणे, त्यात सुधारणा करणे, त्याची व्यवस्था पाहणे, विकास करणे, विनिमय किंवा खरेदी करणे, भाडेपट्ट्याने देणे, गहाण टाकणे, परत करणे, सोडून देणे आणि इतर कोणत्याही रीतीने त्याच्या विषयीची कार्यवाही करणे किंवा ते निकालात काढणे.

२५. कोणत्याही नाट्यगृहाच्या इमारती, स्टुडिओ, प्रयोगशाळा, कार्यालये, कारखाने, धर्मशाळा, हत्यारे व अवजारे, उपसाधने, संयंत्रे किंवा यंत्रसामग्री किंवा कंपनीची उद्दिष्टे पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक अशा इतर गोष्टी यांची सोय करण्याकरीता बांधकाम करणे, संरचना करणे, उभारणी करणे, सुधारणा करणे, व्यवस्था ठेवणे, फेरफार करणे, विस्तार करणे, खरेदी करणे, भाड्याने घेणे, किंवा त्यांचे अन्य प्रकारे संपादन करणे आणि कंपनीची संपूर्ण मालमत्ता व अधिकार किंवा त्यांचा कोणताही भाग निकालात काढणे, त्यांचा फायदेशीर उपयोग करून घेणे किंवा ते अन्य प्रकारे हाताळणे.

२६. पूर्वोक्त उद्दिष्टांसाठी कोणत्याही धारणाधिकाराची जमीन किंवा पिढीजात मिळकत खरेदी करणे, विनिमयात भाडेपट्ट्यावर घेणे किंवा अन्य प्रकारे संपादन करणे आणि कंपनीची कोणतीही वैयक्तिक मालमत्ता विकणे, भाडेपट्ट्याने देणे किंवा अन्य रीतीने निकालात काढणे.

२७. कोणतीही संपदा (इस्टेट) किंवा हितसंबंध खरेदी करणे, भाडेपट्याने किंवा वहिवाटीने घेणे, किंवा विनिमय भाड्याने घेणे, त्याचे नवीकरण करणे, किंवा अन्य प्रकारे संपादन करणे आणि कोणतीही इस्टेट किंवा हितसंबंध धारण करणे, आणि कोणत्याही जमिनी, इमारती, यंत्रसामग्री, सुविधाधिकार, अधिकार, विशेषाधिकार, संयंत्रे, स्टॉक ट्रेड, व्यवसाट संस्था विकल्पाधिकार



(आप्शन), करार, मागण्या, (चोझेस-इन-अॅक्शन) आणि कंपनीच्या कोणत्याही व्यवसायासाठी आवश्यक किंवा सोयीस्कर असेल अशी कोणत्याही प्रकारची कोणतीही खरी आणि वैयक्तिक मालमत्ता पूर्णपणे किंवा तिचा कोणताही भाग भाड्याने किंवा पोटभाड्याने देणे, तिचा विकास करणे, व्यवस्था ठेवणे आणि तिचे समुपयोजन करणे, आणि इष्ट वाटेल त्याप्रमाणे ती एक तर कंपनीच्या व्यवसायाच्या प्रयोजनासाठी ठेवून घेणे किंवा त्यांचा फायदेशीर उपयोग करून घेणे.

२८. उपरोक्त पैकी कोणत्याही उद्दिष्टासाठी परिणामकारकरीतीने भांडवल किंवा अर्थ सहाय्य किंवा जागा प्राप्त करणे किंवा त्यासाठी यंत्रसामग्री, साधनसामग्री, तांत्रिक आणि व्यवस्थापकीय सहाय्य, माहिती, मार्गदर्शन, तपासणी, पर्यवेक्षण आणि इतर सोयी पुरविणे.

२९. कंपनीला प्रोत्साहन देतील अशा प्रकारचे कोणतेही वाणिज्यिक दृष्ट्या वर्धनक्षम कार्यक्रम चालू करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही कंपनी किंवा कंपन्या, व्यवसाय संघ किंवा इतर संस्था स्थापन करणे, त्यांचा विस्तार करणे, त्यांना अर्थ सहाय्य आणि इतर प्रकारचे सहाय्य देणे.

३०. कंपनीच्या उद्दिष्टांसाठी उपयुक्त ठरेल असे कोणतेही व्यापार चिन्ह, पेटंट, अधिकार, शोध, कॉपी राईट, संकल्पचित्र (डिझाईन) किंवा गुप्त कार्यपद्धती यासाठी अर्ज करणे आणि ती मिळवणे, खरेदी करणे किंवा अन्य प्रकारे तिचे संपादन करणे आणि त्यांच्या वापरासाठी लायसन देणे आणि ते चालवणे, त्याचा विकास करणे, पार पाडणे, वापरणे आणि त्यांचा कायदेशीर उपयोग करून घेणे.

३१. चित्रपट, नाट्यकला, लोककला आणि इतर प्रयोगनिष्ठ कला यांच्या क्षेत्रातील सांस्कृतिक कार्यक्रमांशी संबंधित अशा कोणत्याही कंपनीचे किंवा संघटनेचे शेअर, ऋणपत्रे, ऋणपत्र-रोखे आणि इतर कर्ज रोखे काढणे किंवा ते काढण्याबाबत किंवा त्यांच्यावरील व्याज देण्याबाबत हमी देणे, आणि अशा कोणत्याही गोष्टीच्या संबंधात प्रदान करणे किंवा त्याची दलाली कमिशन (अडत) देणे आणि हमी देण्याबाबत सोय करणे.

३२. धनादेश (चेक), हुंड्या, वचन चिठ्ठ्या, ऋणपत्रे आणि इतर परक्राम्य (निगोशिएबल किंवा हस्तांतरणीय संलेख यांचे खाते उघडणे, ते करणे, काढणे, स्वीकारणे, पृष्ठांकित करणे, वटवणे, करून देणे आणि त्यांचे पैसे देणे.

३३. केंद्र शासन किंवा राज्य शासन, स्थानिक संस्था बँका, कंपन्या, विश्वस्त व्यवस्था, संघटना किंवा व्यक्ती यांच्याकडून अनुदाने, देणग्या, अर्थसहाय्य, सप्रयोजन व इतर कर्जे, आगाऊ रकमा किंवा ठेवी म्हणून किंवा इतर प्रकारे इतर पैसे त्यावरील व्याजाच्या सवलतीसह किंवा त्या सवलतीशिवाय, स्वीकारणे.

३४. चित्रपट, नाट्यकला, लोककला आणि इतर प्रयोगनिष्ठ कला या क्षेत्रातील सांस्कृतिक कार्यक्रमांशी संबंधित असतील अशा व्यक्तींना किंवा कंपन्यांना इष्ट वाटेल अशा अटींवर पैसे कर्जाऊ देणे.

३५. कंपनीच्या, या कंपनीच्या शेअरमध्ये असलेल्या पैशाखेरीज, तात्काल आवश्यक नसेल अशा इतर पैशांची वेळोवळी निर्धारित करण्यात येईल अशा रीतीने गुंतवणूक करणे आणि त्याबाबतचे व्यवहार करणे.

३६. जिची उद्दिष्टे पूर्णपणे किंवा काही प्रमाणात या कंपनीच्या उद्दिष्टांसारखीच असतील किंवा जी या कंपनीचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे विस्तार करणारी किंवा प्रगती करणारी असतील अशा कोणत्याही कंपनीचे, संस्थेचे किंवा उपक्रमाचे शेअर किंवा रोखे वर्गणी देऊन, खरेदी करून किंवा इतर प्रकाराने संपादन करणे आणि ते स्वीकारणे, त्यांच्यावर नियंत्रण ठेवणे आणि त्यांची विक्री करणे.

३७. वरील उद्दिष्टे किंवा त्यांपैकी कोणतेही उद्दिष्ट साध्य करण्यासाठी आनुषंगिक किंवा हितावह वाटतील अशा, किंवा तिचे अधिकार वापरताना किंवा कर्तव्ये पार पाडतांना परिणामस्वरूप वाटतील अशा सर्व बाबींवर आणि गोष्टींवर सर्व साधारणपणे कार्यवाही करणे.

३८. भारतात किंवा अन्यत्र कोठेही कंपनीच्या शाखा किंवा एजन्सी स्थापन करणे आणि त्या नियमित करणे आणि त्या बंद करणे.

३९. महाराष्ट्रातील चित्रपट आणि प्रयोगनिष्ठ कला यांची निर्मिती, प्रदर्शन किंवा वितरण यावर परिणाम करणाऱ्या बाबींची माहिती आणि भारतातील इतर ठिकाणची आणि परदेशातली त्याच्याशी संबद्ध अशी इतर आधारसामग्री गोळा करणे आणि पुरविणे.

४०. कोणत्याही चित्रपट उद्योगात आवश्यक असेल असे विदेशी चलन आणि विदेशी सहयोग मिळवणे व तो मिळवण्यात सहाय्य व सल्ला देणे.

४१. ज्यामध्ये किंवा जे सुरू करण्यात किंवा ज्यांच्या प्रतिभूतींवर किंवा ज्यांच्याकडून प्राप्त करण्यायोग्य कोणताही लाभ किंवा वित्तलब्धी असेल त्यासाठी कंपनीला पैसा आणि प्रारंभीचे भांडवल गुंतवावे लागते किंवा तिची पत गुंतवावी लागते अशी कामे, उपक्रम, प्रकल्प किंवा एन्टरप्रायझेस प्रत्यक्षपणे किंवा अंशदान देऊन किंवा इतर सहाय्य देऊन चालू करणे किंवा पार पाडणे.



४२. या कंपनीची किंवा चित्रपट, नाट्यकला, लोककला किंवा इतर प्रयोगनिष्ठ कला यांच्या क्षेत्रातील सांस्कृतिक कार्यक्रमाशी ज्यांचा संबंध आहे. अशा इतर कोणत्याही कंपनीची कोणतीही मालमत्ता आणि दायित्वे संपादन करण्याच्या आणि हाती घेण्याच्या किंवा तिच्या उद्दिष्टांना प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पाठिंबा देण्याच्या प्रयोजनासाठी किंवा कंपनीला इष्ट वाटेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी कंपन्या, व्यवसाय संघ किंवा सर्व प्रकारच्या भागीदारी तयार करणे, त्यांचा विस्तार करणे किंवा त्या संघटीत करणे आणि त्या तयार करण्यामध्ये, त्याचा विस्तार करण्यामध्ये, त्यांना अर्थसहाय्य देण्यामध्ये त्या संघटीत करण्यामध्ये किंवा त्यांना सहाय्य देण्यामध्ये सहाय्य करणे किंवा मदत करणे, आणि अशा कोणत्याही कंपन्यामधील किंवा कंपन्याचे शेअर ऋणपत्रे, आणि इतर कर्जरोखे घेणे किंवा अन्य प्रकारे संपादन करणे, धारण करणे आणि निकालात काढणे, आणि अशा कोणत्याही कंपनीला अर्थसहाय्य देणे किंवा इतर प्रकारे सहाय्य करणे.

४३. हुंड्या, वचनचिठ्या आणि इतर परक्राम्य (निगोशिएबल) किंवा हस्तांतरणीय संलेख काढणे, करणे स्वीकारणे, पृष्ठांकित करणे, वटवणे, करून देणे आणि काढणे.

४४. त्यावेळी कंपनी करीत असेल अशा कोणत्याही व्यवसायासाठी आवश्यक किंवा सोयीस्कर असेल असा धंदेमाल, माल, जंगम मालमत्ता आणि चीजवस्तू वेळोवेळी संपादन करणे आणि अशा सर्व गोष्टीची निर्मिती करणे त्या संबंधातली कार्यवाही करणे.

४५. भांडवल पुरविणारे, सवलती देणारे आणि व्यापारी यांची कामे पार पाडणे आणि सर्व प्रकारची आर्थिक वाणिज्यिक, व्यापारी आणि इतर कामे आणि कोणत्याही उद्दिष्टांशी संलग्न असलेले सोयीस्करपणे पार पाडण्याची क्षमता आहे असे वाटत असतील असे किंवा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कंपनीची कोणतीही मालमत्ता किंवा अधिकार याच्या किंमतीत वाढ करतील किंवा तिची वसुली सुलभ करतील किंवा ती फायदेशीर करतील अशी पूर्व कल्पना असलेले देशांतर्गत कायद्यांनुसार अनुज्ञेय असतील असे इतर व्यवसाय हाती घेणे आणि पार पाडणे आणि अंमलात आणणे.

४६. प्रशिक्षण संस्था आणि संशोधन प्रयोगशाळा आणि वैज्ञानिक, तांत्रिक संशोधन आणि प्रयोग याबाबतच्या प्रायोगिक कर्मशाळा स्थापन करणे, त्यांची सोय करणे, त्यांची व्यवस्था ठेवणे व चालविणे किंवा अन्य प्रकारे अर्थसहाय्य देणे किंवा तिचा सभासद होणे आणि वैज्ञानिक आणि तांत्रिक संशोधन, प्रयोग आणि सर्व प्रकारच्या चाचण्या हाती घेणे व पार पाडणे आणि प्रयोगशाळा, कर्मशाळा, ग्रंथालये व्याख्याने, बैठकी आणि चर्चासत्रे यांची सोय करून त्यांना अर्थसहाय्य देऊन, स्थायी निधी देऊन आणि सहाय्य करून आणि वैज्ञानिक किंवा तांत्रिक प्राध्यापकांना, शिक्षकांना किंवा कामगारांना पारिश्रमिक देण्याची सोय करून आणि प्रदर्शकासाठी बक्षिसे, विद्यार्थी आणि इतरांना शिष्यवृत्त्या, पारितोषिके आणि अनुदाने यांची सोय करून वैज्ञानिक व

तांत्रिक या दोन्ही क्षेत्रांतील अभ्यास व संशोधन अन्वेषण आणि नवशोधन वाढीस लावणे आणि कंपनीची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी ज्याची मदत होते असे समजता येईल असा कोणत्याही प्रकारचा अभ्यास, संशोधन, अन्वेषण, प्रयोग, चाचण्या आणि नवे शोध यांना प्रोत्साहन देणे, त्यांचा विस्तार करणे आणि त्यासाठी बक्षिसे देणे.

४७. ठेव म्हणून किंवा कर्जाऊ पैसे स्वीकारणे आणि कंपनीला योग्य वाटेल अशा पद्धतीने आणि विशेषत: ऋणपत्रे किंवा ऋणपत्र-रोखे, शासन ऋणपत्रे काढून किंवा अन्य प्रकाराने पैसे कर्जाऊ घेणे, उभारणे, किंवा प्राप्त करणे, आणि कर्जाऊ घेतलेल्या, उभारलेल्या किंवा मागणी न केलेल्या भांडवलासह कंपनीच्या (सध्याच्या आणि भविष्यकाळातील) सर्व किंवा कोणत्याही मालमत्तेवर किंवा मत्तांवर गहाण, भार किंवा धारणाधिकार याद्वारे देणे लागत असलेल्या पैशाच्या आणि तसेच, यथास्थिती, कंपनी किंवा इतर कोणतीही व्यक्ती किंवा कंपनी यांनी स्वीकारलेल्या कोणत्याही दायित्वाचे कंपनीने किंवा इतर कोणत्याही व्यक्तीने किंवा कंपनीने पालन करण्याची निश्चिती करण्यासाठी आणि त्याबाबतची हमी देण्यासाठी तशाच प्रकारच्या गहाणाद्वारे, भाराद्वारे किंवा धारणाधिकाराद्वारे देणे लागत असलेल्या कोणत्याही पैशाच्या परतफेडीची निश्चिती करणे, मात्र, बँक विनियमन अधिनियम, १९४९ यामध्ये व्याख्या केलेला बँकेचा इतर कोणताही व्यवसाय कंपनी करणार नाही.

४८. कोणत्याही निगमाला (corporation) किंवा व्यक्तीला, मग ती कंपनीची संचालक असो वा नसो. तंत्रविशिष्ट ज्ञानासाठी दलाली, अडत, स्वामित्वाधिकार या स्वरूपात आणि इतरांना, कंपनीला कोणतीही सेवा देण्यासाठी किंवा व्यवसाय सुरू करण्यासाठी, अभिदान मिळवण्यासाठी किंवा अभिदानाची हमी देण्यासाठी किंवा कंपनीचे किंवा या कंपनीने प्रचालन केलेल्या किंवा तिला ज्याविषयी आस्था आहे अशा संघाचे शेअर, ऋणपत्रे, ऋणपत्र-रोखे किंवा कर्जरोखे गुंतवण्यासाठी किंवा गुंतवण्यात सहाय्य करण्यासाठी किंवा कंपनीला इतर प्रकारे सहाय्य करण्यासाठी किंवा सेवा देण्यासाठी इतर प्रकारे पारिश्रमिक देणे.

४९. कंपनीच्या वतीने किंवा कंपनी विरुद्धचे किंवा ज्यामध्ये कंपनीचा हितसंबंध किंवा संबंध आहे असे, कंपनी आणि एक किंवा अनेक सदस्य किंवा त्याचे किंवा त्यांचे प्रतिनिधी यांमधील अथवा कंपनी आणि त्रयस्थ पक्ष यांमधील कोणतेही दावे, मागण्या, वाद किंवा इतर कोणताही प्रश्न भारतातील किंवा भारता बाहेरच्या कोणत्याही ठिकाणी लवादाकडे विचारार्थ पाठवणे किंवा पाठवण्यास मान्यता देणे आणि निवाडा मानणे, आचरणात आणणे व तो पार पाडण्याकरिता किंवा अंमलात आणण्याकरिता सर्व कृती व सर्व गोष्टी करणे.

५०. कंपनीची रचना आणि तिची नोंदणी आणि तिचे भांडवल विक्रीस काढणे आणि त्याच्या संबंधातील कोणतीही हमी देणे किंवा इतर अडचण, वटणावळ फी आणि आकार देणे यासाठीचे सर्व खर्च आणि त्या संबंधातले आनुषंगिक खर्च यांचे प्रदान करणे.



५१. औद्योगिक किंवा कामगार विषयक समस्या किंवा त्रासदायक प्रश्न यांवर उपाय शोधून काढण्याचा, त्यांत तडजोड करण्याचा किंवा त्यावर मात करण्याचा किंवा उद्योगाची वा व्यापाराची प्रगती करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही संघटनेला, संस्थेला किंवा चळवळीला आर्थिक किंवा इतर सहाय्य देणे. परंतु अशी संघटना, संस्था किंवा चळवळ ही, चित्रपट, नाट्यकला, लोककला व इतर प्रयोगनिष्ठ कला या क्षेत्रातील सांस्कृतिक कार्यक्रमांशी संबंधित असावी.

५२. कंपनीच्या व्यवसायाच्या किंवा कोणत्याही मालमत्तेच्या घसाऱ्यासाठी किंवा तिच्या दुरुस्तीसाठी, तिच्यात सुधारणा करण्यासाठी, तिचा विस्तार करण्यासाठी किंवा व्यवस्था ठेवण्यासाठी किंवा कंपनीच्या दृष्टीने हितावह ठरेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी कोणताही घसारा निधी, राखीव निधी, कर्जनिवारण निधी, विमा निधी किंवा इतर कोणताही विशेष निधी निर्माण करणे.

५३. कार्यक्रम आयोजित करून पारितोषिके, बक्षिसे, पदके, करंडक इत्यादी देऊन किंवा व्याख्याने, चर्चा, पत्रव्यवहार चर्चासत्रे इत्यादी याद्वारे, मासिके, वर्तमानपत्रे नियतकालिके, नकाशे, तक्ते, आकडेवारी, संदर्भ पुस्तके इत्यादी प्रसिद्ध करून आणि कथा, पटकथा इत्यादींची पाहणी करून व त्यावर टीका करून चित्रपट, नाट्यकला, लोककला आणि इतर प्रयोगनिष्ठ कला या क्षेत्रामधील सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देणे, सहाय्य करणे आणि त्यांच्या संबंधातील ज्ञानाची आणि माहितीची व्याप्ती वाढविणे.

५४. चित्रपट किंवा नाटके यांचे चित्रपटगृहाची किंवा नाट्यगृहाची आवश्यकता नसणारे व नफ्यावरचा विचार नसणारे प्रयोग आणि दूरदर्शन वरील प्रयोग यांच्या वाढीसाठी मदत करणे.

५५. भारतात आणि परदेशात महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आणि महाराष्ट्रातील सांस्कृतिक कार्यक्रम यांचे दर्शन घडेल अशा दृष्टीने चित्रपट आणि दूरदर्शन वरील लाइव्ह कार्यक्रम यांची निर्मिती व प्रदर्शन करण्यास सहाय्य व मार्गदर्शन करणे आणि सहयोग देणे.

५६. कंपनीमध्ये नोकरीला असलेल्या व्यक्ती आणि अशा व्यक्तींच्या पत्नी, विधवा, आणि कुटुंबे यांना भविष्य निर्वाह निधि व इतर निधि स्थापन करून, पैशाच्या स्वरूपातील निवृत्ती वेतन किंवा इतर प्रदाने देऊन आणि शिक्षणाच्या आणि मनोरंजनाच्या जागा आणि रुग्णालये, दवाखाने, वैद्यकीय आणि इतर परिचर्येची ठिकाणे आणि इतर मदत यांची सोय करून आणि त्यासाठी अभिदान देऊन त्यांच्या कल्याणासाठी तरतूद करणे, कंपनीला योग्य वाटतील अशी सर्व प्रकारची राहाती घरे किंवा निवासस्थाने बांधणे किंवा त्यांची रचना करणे आणि कोणत्याही परोपकारी किंवा लोकहितैषी उद्दिष्टासाठी किंवा कोणत्याही प्रदर्शनासाठी किंवा कोणत्याही जाहीर खेळासाठी (शो) किंवा उपयुक्त उद्दिष्टासाठी किंवा त्यामध्ये अंशदान करणे किंवा त्याला अन्य प्रकारे मदत करणे.

५७. कंपनीच्या सर्व किंवा कोणत्याही मालमत्तेच्या व अधिकारांच्या संबंधात, सुधारणा, व्यवस्थापन किंवा वाढ करणे किंवा त्याबाबतचे अधिकार किंवा विशेषाधिकार देणे किंवा अन्य व्यवहार करणे.

५८. कंपनीची संपूर्ण किंवा आंशिक मालमत्ता, जोखीम किंवा नफा यांचा पूर्णपणे किंवा अंशत: विमा उतरवणे, कंपनीच्या कोणत्याही बाबतीतील दायित्वाचे किंवा हानीचे पूर्णपणे किंवा अंशत: संरक्षण व क्षतिपूरण (indemnify) करणे. आणि तसेच, त्याचा कोणताही भाग किंवा घटक याचा आपसमेळाद्वारे किंवा अन्य प्रकारे विमा उतरवणे आणि त्याला संरक्षण देणे आणि त्याचे क्षतिपूरण करणे आणि सर्व प्रारंभिक निगमन विषयक आणि उपक्रम विषयक खर्च करणे.

५९. संघ, संस्था, निधी, विश्वस्त व्यवस्था आणि कंपनीचे कर्मचारी किंवा माजी कर्मचारी किंवा पूर्वी या व्यवसायात असणाऱ्या व्यक्ती (predecessors) किंवा अशा व्यक्तींवर अवलंबून असलेल्या व्यक्ती यांना हितावह ठरतील असे वाटणाऱ्या सुखसोयी सुरु करणे किंवा त्यांना पाठिंबा देणे किंवा त्या सुरू करण्यास किंवा त्यांना पाठिंबा देण्यास मदत करणे, आणि निवृत्ति वेतन व भत्ते देणे आणि विमा उतरण्यासाठी पैसे देणे आणि परोपकारी किंवा लोकहितैषी उद्दिष्टांसाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक, सर्वसाधारण किंवा उपयुक्त उद्दिष्टासाठी आयोजिलेल्या प्रदर्शनासाठी अभिदान किंवा पैशाची हमी देणे.

६०. बोनस शेअर गुंतवणे, राखून ठेवणे किंवा सदस्यांमध्ये वाटणे, किंवा कंपनीने हप्त्यांवर काढलेल्या शेअरवरील हप्त्याच्या रूपाने मिळालेला कोणत्याही पैसा आणि जप्त करण्यात आलेल्या शेअरवर देण्यात आलेल्या लाभांशाच्या संबंधात मिळालेल्या पैशाचा कंपनीला वेळोवेळी योग्य वाटेल अशा रीतीने इतर प्रकारे उपयोग करणे.

६१. कंपनीची सर्व किंवा कोणतीही मालमत्ता, सदस्यांमध्ये, कंपनी अधिनियमान्वये अनुज्ञेय असेल त्या प्रमाणे रोख रकमेत किंवा वस्तूच्या स्वरुपात वाटणे.

६२. जी मालमत्ता संपादन करण्यास कंपनीला अधिकृत करण्यात आले असेल अशी कोणतीही मालमत्ता इतरांच्या नावाने धारण करणे.

६३. कंपनीच्या मते फायदेशीर ठरेल किंवा उपरोक्त अशा इतर कोणत्याही व्यवसायाचा विस्तार करून किंवा त्याच्या संबंधात कंपनीला जो सहजपणे चालवता येईल असा किंवा जो कंपनीच्या व्यवसायाच्या कोणत्याही शाखेचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे विकास करील किंवा कंपनीच्या कोणत्याही मतांचे, मालमत्तेचे किंवा अधिकारांचे मूल्य वाढवील किंवा त्यांचा फायदेशीर उपयोग करून घेईल असे वाटेल असा कोणताही इतर व्यापार किंवा व्यवसाय चालवणे.

६४. वरीलपैकी कोणत्याही व्यवसायांबरोबर चालवता येईल असा एजन्सी व्यवसाय करणे किंवा चालविणे.



६५. चित्रपट, नाट्यकला, लोककला आणि इतर प्रयोगनिष्ठ कला यांच्या क्षेत्रातील सांस्कृतिक कार्यक्रमांशी संबंधित अशा व्यवसाय संस्था आणि उपक्रम यांची परिस्थिती, भवितव्य, मूल्य, स्वरूप आणि सद्य:स्थिती यांचे आणि सर्वसाधारणपणे कोणतीही मत्ता, सवलती (कन्सेशन) आणि मालमत्ता किंवा अधिकार यांचे अन्वेषण आणि पाहाणी करण्यासाठी तज्ञ नेमणे.

६६. भारताबाहेरच्या कोणत्याही ठिकाणच्या कायद्याच्या कक्षेत आणि त्यानुसार कंपनीला नोंदणी व मान्यता मिळवणे.

६७. जगाच्या कोणत्याही भागात स्थानिक क्षेत्रातील तशाच स्वरुपाच्या कंपन्या किंवा भागीदारी संस्था धारण करीत असतील असे अधिकार आणि विशेषाधिकार कंपनीला देण्यासाठी आवश्यक ठरतील असे उपाय योजणे.

६८. भारतातील आणि इतर ठिकाणच्या चित्रपट, नाट्यकला, प्रयोगनिष्ठ कला इत्यादी क्षेत्राशी संबंधित असलेले चित्रपट निर्मात्यांचे संघ आणि इतर संघटना यांच्याशी संपर्क ठेवणे आणि चित्रपट उद्योग, नाट्यकला, प्रयोगनिष्ठ कला इत्यादींना संरक्षण देण्यासाठी आणि त्यांच्या उत्कर्षासाठी एकत्रित प्रयत्न करणे व उपाय काढणे.

**क. इतर उद्दिष्टे - काही नाही**

**चार.** सदस्यांचे दायित्व मर्यादित आहे.

**पाच.** कंपनीचे भाग भांडवल रु. २,५०,००,००० (दोन कोटी पन्नास लाख रुपये) इतके आहे ते प्रत्येकी १०० रुपयांच्या (फक्त शंभर रुपये) २,५०,००० (दोन लाख पन्नास हजार) इक्विटी शेअर (सममूल्य रोखे) मध्ये विभागलेले आहे व ते कंपनीच्या विनियमानुसार आणि त्यावेळी याबाबतीत अंमलात असलेल्या वैधानिक तरतुदीनुसार वेळोवेळी असे भांडवल वाढविण्याच्या किंवा कमी करण्याच्या शक्तीच्या आणि भांडवलातील शेअर इक्विटी शेअर भांडवलात किंवा प्रेफरन्स शेअर भांडवलात विभागणी करण्याच्या आणि तेथे अनुक्रमे कोणताही खास, मर्यादित केलेला किंवा विशेष अधिकार किंवा विशेषाधिकार किंवा शर्त जोडण्याच्या शक्तीच्या अधीन असेल. जर व जेव्हा कंपनीच्या भांडवलाची विभागणी विविध प्रकारच्या शेअरमध्ये करण्यात येईल तर व तेव्हा कंपनीच्या संस्थापन समयलेखामध्ये आणि त्यावेळी अंमलात असलेल्या वैधानिक तरतुदींमध्ये तरतूद करण्यात आल्याप्रमाणे अशा कोणत्याही वर्गाच्या अधिकारात बदल किंवा फेरबदल करता येतील, तो अंमलात आणता येईल, त्याचा विस्तार करता येईल, त्याचे निराकरण करता येईल किंवा तो परत करता येईल.

ज्यांची नावे, पत्ते आणि वर्णने सोबत स्वाक्षरित केली आहेत अशा आम्ही काही व्यक्ती संस्थापन समय लेखाचे पालन करून एक कंपनी स्थापन करू इच्छितो, आणि त्या प्रत्येकाच्या नावासमोर अनुक्रमे दर्शवण्यात आलेले, कंपनीच्या भाग भांडवलातील शेअर घेण्याशी आम्ही सहमत आहोत.

| अनु. क्रमांक | भागधारकाचे नाव, पत्ता वर्णन आणि व्यवसाय | प्रत्येक भागधारकाने घेतलेल्या सममूल्य भागांची संख्या | भागधारकाची सही | साक्षीदाराचे नाव पत्ता, वर्णन व व्यवसाय आणि त्यांची सही |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | महाराष्ट्राचे राज्यपाल प्रतिनिधी : | | | |
| १. | श्री. वसंत,वडिलांचे नाव श्री. बलवंत रामराव मंडलेकर, २०/५, 'रवी' जुहू सोसायटी, दौलताबाद देसाई नगर, जुहू रस्त्यालगत, सांताक्रुज (पश्चिम), मुंबई-४०० ०५४. सचिव महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. | नऊ (९) | सही/- (व्ही. बी. मंडलेकर) | श्री. राम वडिलांचे नाव श्री. नारायण हरि गबाले ६८६, मंजुळा निवास, १६ वा रस्ता, खार, मुंबई - ४०० ०५२. संचालक (चित्रपट), महाराष्ट्र शासन. |
| २. | श्री. दामोदर, वडिलांचे नाव श्री. काशिनाथ वासुदेव केंकरे, २३, कला नगर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१, संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, | एक (१) | सही/- (डी. के. केंकरे) | श्री.ज्ञानेश्वन, वडिलांचे नाव श्री. मारुतीराव रामचंद्र ढगे, ४१, मंगेश सदस, लेडी जमशेटजी मार्ग, शिवाजी पार्क, मुंबई - ४००.०२८. |

मुंबई, दिनांक २६ सप्टेंबर १९७७.



# महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित, याची संस्थापन नियमावली

## एक. अर्थउकल

१. या नियमालवलीमध्ये विषय किंवा संदर्भ यांमध्ये त्यांच्याशी विसंगत काही नसेल तर- अधिनियमाच्या व्याख्या.

'कंपनी' याचा अर्थ, महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ मर्यादित असा होतो.

'अधिनियम' याचा अर्थ वेळोवेळी अंमलात असलेला कंपनी अधिनियम, १९५६ (१९५६ चा १) असा असून त्यात त्याखाली करण्यात आलेल्या सर्व नियमांचा समावेश होतो.

'कार्यालय' याचा अर्थ कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असा आहे.

'राज्यपाल' याचा अर्थ, महाराष्ट्राचे राज्यपाल असा होतो.

'लेखी' आणि 'लिहिलेले' यामध्ये शब्द दृश्य स्वरुपात मांडणाऱ्या आणि त्यांची नक्कल करणाऱ्या अशा मुद्रण, शिलमुद्रण व अन्य पद्धतींचा समावेश होतो.

'संचालक' याचा अर्थ, त्यावेळी असलेले कंपनीचे संचालक असा होतो.

'लाभांश' यात बोनसचा समावेश होतो.

'मृत्युपत्र व्यवस्थापक' किंवा 'प्रशासक' याचा अर्थ एखाद्या सक्षम न्यायालयाकडून जिने मृत्युप्रमाणपत्र किंवा प्रबंधपत्र मिळविलेले आहे अशी व्यक्ती असा आहे.

'महिना' याचा अर्थ कॅलेंडर महिना असा आहे.

'भांडवल' याचा अर्थ, कंपनीच्या कामाकरता त्या त्यावेळी उभारण्यात आलेले किंवा उभारण्याचा प्राधिकार दिलेले भांडवल असा असून त्यामध्ये कंपनीच्या भरणा झालेल्या भांडवलाचाही समावेश होतो.

'शेअर्स' याचा अर्थ भांडवलाची विभागणी ज्यामध्ये करण्यात आली आहे असे शेअर्स किंवा असा रोखा असा असून त्यामध्ये अशा शेअर्सशी किंवा रोख्यांशी संबद्ध असणाऱ्या व्याजाचा समावेश होतो.

'मंडळ' याचा अर्थ, संचालकांची यथोचितरीत्या बोलावण्यात आलेली व प्रस्थापित सभा किंवा प्रकरणपरत्वे एखाद्या सभेसाठी एकत्र जमलेले संचालक.

'व्यक्ती' या संज्ञेत व्यक्तींचा व एकेकजणाचाही (Individuals) तसेच निगमनिकायांचा समावेश होतो.

'मुद्रा' याचा अर्थ कंपनीची त्या त्यावेळी असलेली सामायिक मुद्रा.

'वित्तीय वर्ष' याचा अर्थ, ज्याच्या संबंधात कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत तिच्यापुढे मांडण्यात यावयाचा नफा तोटा पत्रक तयार करण्यात येतो असा कालावधी असा होतो मग असा कालावधी वर्षाचा असो किंवा नसो.

एकवचनी संख्येचा बोध ज्यावरून होतो अशा शब्दांवरून अनेकवचनी संख्येचा बोधही होईल त्याचप्रमाणे अनेकवचनी संख्येचा बोध ज्यावरून होतो अशा शब्दांवरून एकवचनी संख्येचा बोधही होईल.

पुल्लिंगी शब्दांचा बोध करून देणाऱ्या शब्दांवरून स्त्रीलिंगी शब्दांचाही बोध होईल.

**अधिनियमातील शब्दप्रयोगांना नियमावलीत तेच अर्थ असणे.**

पूर्वोक्तास अधीन राहून, अधिनियमात व्याख्या करण्यात आलेले कोणतेही शब्द किंवा शब्दप्रयोग यांना, विषय किंवा संदर्भ यात प्रतिकूल काही नसेल तर या नियमावलीत तेच अर्थ असतील.

**कंपनी ही खाजगी कंपनी असणे**

२. कंपनी ही खाजगी कंपनी असेल आणि तद्नुसार

(अ) (एक) कंपनीत नोकरीला असतील अशा व्यक्ती आणि (दोन) पूर्वी कंपनीत नोकरीला असतील आणि त्या नोकरीवर असताना कंपनीच्या सदस्य झाल्या असतील आणि नोकरी संपल्यानंतरही असे सदस्य असण्याचे चालू राहिल्या असतील अशा व्यक्ती वगळता कंपनीच्या सदस्यांची संख्या पन्नासहून अधिक असणार नाही, परंतु दोन किंवा त्याहून अधिक व्यक्ती संयुक्तपणे कंपनीचा एक शेअर अधिक शेअर्स धारण करीत असतील त्याबाबतीत, या नियमावलीच्या प्रयोजनार्थ अशा व्यक्ती ही जणू काही एकच सदस्य असल्याचे समजण्यात येईल.

(ब) कंपनीतील कोणत्याही शेअर्समध्ये किंवा ऋणपत्रांमध्ये अभिदान करण्याकरता जनतेला कोणत्याही प्रकारे आवाहन करण्यास याद्वारे मनाई करण्यात आली आहे.



(क) यात यापुढे तरतूद करण्यात आल्याप्रमाणे शेअर्स हस्तांतरित करण्याचा अधिकार मर्यादित करण्यात आला आहे.

**कंपनी ही सरकारी कंपनी असेल.**

३. कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम ६१७ च्या व्याख्येनुसार मदर कंपनी ही सरकारी कंपनी असेल.

**एतद्विरुद्ध तरतूद केली नसेल तेव्हा तक्ता 'अ' लागू असणे.**

४. अधिनियमाच्या पहिल्या अनुसूचीतील तक्ता 'अ' मध्ये अंतर्भूत असलेले विनियम हे या नियमाद्वारे किंवा तदन्वये खास करून नगळण्यात आले नसले तर लागू असतील.

**कंपनीला ही नियमावली लागू असणे.**

५. कंपनीच्या व्यवस्थापनासाठी केलेले आणि तिच्या सदस्यांनी व त्याच्या प्रतिनिधीने पाळावयाचे नियम हे, अधिनियमात विहित केल्याप्रमाणे किंवा त्याद्वारे अनुज्ञेय असेल त्याप्रमाणे विशेष आदेशाद्वारे कंपनीचे नियम रद्द करण्याच्या त्यात फेरबदल करण्याच्या किंवा त्यात भर घालण्याच्या संदर्भात कंपनीच्या कोणत्याही वैद्यानिक शक्तींचा कोणताही वापर करण्याच्या अधीनतेने था नियमावलीतील नियमांप्रमाणे असतील.

## दोन. भाग भांडवल

**भांडवल.**

६. कंपनीचे प्राधिकृत भाग भांडवल रु. २,५०,००,००० (रुपये अडीच कोटी) इतके असून ते रु. १०० (रुपये शंभर फक्त) च्या २,५०,००० (दोन लाख व पन्नास हजार) साधारण शेअर्समध्ये विभागण्यात आले आहे.

**कंपनीचा शेअर खरेदी करता येणार नाही.**

७. कंपनीच्या निधीचा कोणताही भाग कंपनीचे शेअर्स खरेदी करण्याच्या कामी किंवा कंपनीच्या शेअर्सच्या प्रतिभूती (security) वर कर्जे देण्याच्या कामी लावण्यात येणार नाही.

**शेअर्सचे नियतवाटप.**

८. अधिनियमाच्या उपबन्धांना व या नियमावलीस आणि राज्यपालांच्या निदेशास अधीन राहून शेअर्स, संचालक मंडळाच्या नियंत्रणाधीन असतील व त्यास स्वत:स योग्य वाटेल अशा अटी व शर्तींवर शेअर्सचे स्वत:स योग्य वाटतील अशा व्यक्तीमध्ये नियतवाटप करता येईल किंवा त्यांची विल्हेवाट लावता येईल.

**शेअर्स गुंतवण्याकरीता कमिशन**

९. कंपनी कोणतेही शेअर्स ऋणपत्रे किंवा ऋणपत्र-रोखे यांच्याकरता अभिदान दिल्याबद्दल किंवा अभिदान देण्याचे बिनशर्तपणे किंवा शर्तीवर कबूल केल्याबद्दल किंवा अभिदान मिळविल्याबद्दल किंवा मिळविण्याचे बिनशर्त किंवा शर्तीवर कबूल केल्याबद्दल कोणत्याही व्यक्तींना कोणत्याही वेळी कमिशन देऊ शकेल, मात्र शेअर्सच्या सबंधात कमिशन देण्यात येईल तेव्हा कोणत्याही रकमेबाबत कायद्याने येणाऱ्या शर्ती व आवश्यकता यांचे पालन करण्यात येईल. शेअर्सच्या बाबतीत कमिशनचा दर ज्या किमतीला शेअर्स विक्रीस काढण्यात येतील त्याच्या ५ टक्यांहून अधिक असणार नाही व ऋणपत्रांच्या बाबतीत, ज्या किंमतीला ऋणपत्रे विक्रीस काढण्यात येतील त्याच्या २$\frac{१}{२}$ टक्के इतका असेल कमिशन रोख देण्यांत येईल किंवा शेअर्स, ऋणपत्रे किंवा कंपनीच्या ऋणपत्र निधीच्या स्वरुपात देण्यात येईल.

**शेअर पत्र.**

१०. नोंदवहीत सदस्य म्हणून नाव दाखल करण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस कंपनीची मुद्रा असणारे शेअर्स मिळण्याचा हक्क असेल व त्यात अशा व्यक्तीने धारण केलेला शेअर किंवा शेअर्स व त्याकरता दिलेली रक्कम विनिर्दिष्ट करण्यात येईल. परंतु, अनेक व्यक्तींनी संयुक्तपणे धारण केलेल्या एका किंवा अधिक शेअर्सच्या बाबतीत, कंपनी एकाहून अधिक शेअरपत्रे देण्यास बांधलेली असणार नाही आणि एखाद्या शेअरकरता अनेक संयुक्त-धारकांपैकी एका धारकाला भागपत्र देणे हे सर्वांना शेअरपत्र दिल्यासारखेच असेल.

**विरुपित झालेल्या, हरवलेल्या किंवा नष्ट झालेल्या शेअर पत्राच्या ऐवजी नवीन शेअरपत्र देणे.**

११. शेअरपत्र विरुपित झाले असेल, हरवले असेल किंवा नष्ट झाले असेल त्याबाबतीत पुरावा व क्षतिपूर्ती म्हणून मंडळास योग्य वाटेल अशी फी दिल्यावर व कोणत्याही शर्ती असल्यास, त्यांवर अशा शेअरपत्राचे नूतनीकरण करता येईल.

## तीन. शेअर्सवर रकमांची मागणी करणे.

**शेअर्सवर रकमांची मागणी करणे.**

१२. मंडळास, सदस्यांकडून आपल्या शेअर्सवर देण्याचे राहून गेलेल्या रकमेच्या संबंधात वेळोवेळी मागणी करता येईल आणि अशा रकमांचा भरणा करण्याची वेळ किंवा वेळा विनिर्दिष्ट करता येतील आणि प्रत्येक सदस्य त्याच्या शेअर्सवर मागणी करण्यात आलेली रक्कम अशा प्रकारे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या वेळेत किंवा वेळांत कंपनीला देईल.

परंतु तसे असले तरी मंडळास, वेळोवेळी, केवळ स्वविवेकानुसार कोणत्याही मागणी रकमेच्या भरण्याची निश्चित करण्यात आलेली मुदत वाढवून देता येईल.

**मागणी रकमेवर व्याज कधी प्रदेय होईल.**

१३. कोणत्याही मागणीच्या संबंधात प्रदेय असलेली रक्कम, ती नियत दिनांकास किंवा तत्पूर्वी देण्यात आली नाही तर, त्यावेळी शेअर धारण करणारी व्यक्ती किंवा ज्याच्या संबंधात मागणी करण्यात आली असेल असा शेअरचा काही भाग जिला मिळाला आहे अशी व्यक्ती, अशा रकमेवर, मंडळ निश्चित करील अशा दरसाल ६ टक्क्यांहून अधिक नसेल अशा दराने, अशा व्याजाच्या प्रदानाकरता नियत करण्यात आलेल्या दिनांकापासून ते प्रत्यक्ष प्रदानाच्या वेळेपर्यंत व्याज प्रदान करील. परंतु मंडळास अशा व्याजाची रक्कम पूर्णत: किंवा अंशत: सोडून देता येईल.

**मागणीच्या अपेक्षेने केलेल्या प्रदानावर व्याज देता येईल.**

१४. मंडळास योग्य वाटल्यास, कोणत्याही सदस्यांची, प्रत्यक्षात मागणी केलेल्या रकमेपेक्षा अधिक रकमेच्या धारण केलेल्या शेअरांबद्दल देय असलेला सर्व किंवा कोणताही पैसा आगाऊ देण्याची इच्छा असेल तर त्याच्याकडून असा पैसा मंडळाला स्वीकारता येईल आणि पैसा आगाऊ दिल्यावर किंवा ज्या शेअरांच्या बाबतीत असा आगाऊ पैसा देण्यात आला असेल अशा शेअरच्या मागणी केलेल्या रकमेपेक्षा वेळोवेळी अधिक होईल तितक्या तिच्या भागावर सदस्य रक्कम आगाऊ देत असल्याने व मंडळाला ते मान्य असल्याने कंपनी वर्षाला ६ टक्क्यांहून अधिक होणार नाही अशा दराने व्याज देऊ शकेल आणि मंडळ, कोणत्याही वेळी अशा सदस्यांना तीन महिन्यांची लेखी नोटीस देऊन अशी आगाऊ रक्कम परत करू शकेल.



**संयुक्त धारकांचे रकमा देण्याचे दायित्व.**

१५. संयुक्तपणे शेअर धारण करणाऱ्या व्यक्ती अशा शेअरच्या संबंधात मागणी करण्यात आलेल्या रकमांच्या प्रदानास संयुक्तपणे व स्वतंत्रपणे जबाबदार असतील.

**न्यासाला शेअरधारक म्हणून मान्यता न देणे.**

१६. कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही न्यासासाठी (ट्रस्टसाठी) कोणतेही शेअर धारण करण्यास कंपनी मान्यता देणार नाही आणि या नियमावलीनुसार स्पष्टपणे केलेली तरतूद किंवा अधिनियमानुसार आवश्यक असणारी गोष्ट किंवा न्यायालयाच्या कोणत्याही आदेशानुसार केलेली गोष्ट या बाबी सोडल्या तर कोणत्याही शेअर मधील कोणताही समान, आकस्मिक, भविष्यकालीन किंवा आंशिक हितसंबंध किंवा कोणत्याही शेअरबाबत नोंदणीकृत धारकाच्या संपूर्ण, बिनशर्त अधिकाराशिवाय इतर कोणताही अधिकार मान्य करणे कंपनीवर बंधनकारक असणार नाही किंवा कंपनीला आवश्यक असणार नाही.

## चार. धारणाधिकार

**मागणी प्रमाणे रकमा न भरलेल्या शेअर वरील धारणाधिकार.**

१७. (१) (अ) कंपनीचा, (पूर्ण रक्कम देण्यात न आलेल्या) प्रत्येक शेअरवर, त्याच्या संबंधात मागणी करण्यात आलेल्या किंवा नियत वेळात देण्यात यावयाच्या सर्व पैशावर (असा पैसा ताबडतोब देण्यात यावयाचा असो किंवा नसो,) आणि

(ब) एकाच व्यक्तीच्या नावावर नोंदण्यात आलेल्या तिच्याकडून किंवा तिच्या संपदेकडून कंपनीला तात्काळ देय असलेल्या सर्व पैशाच्या संबंधात (पूर्ण रक्कम न देण्यात आलेल्या सर्व शेअर्सवर) सर्वप्रथम व सार्वभौम धारणाधिकार असेल परंतु, मंडळास कोणत्याही वेळी, कोणत्याही शेअरला पूर्णपणे किंवा अंशत: या नियमावलीच्या तरतुदींमधून सूट देण्यात आल्याचे घोषित करता येईल.

(२) कंपनीचा शेअरवर असलेला धारणाधिकार अशा शेअरवर देय असलेल्या सर्व लाभांशांवर देखील लागू होईल.

**विक्रीद्वारे धारणाधिकाराची अंमलबजावणी**

१८. मंडळास योग्य वाटेल अशा रीतीने कंपनीस, ज्यावर तिचा धारणाधिकार असेल असा कोणताही शेअर विकता येईल. परंतु

(अ) जिच्या संबंधात धारणाधिकार असेल अशी रक्कम ताबडतोब देय असल्याखेरीज; किंवा

(ब) ज्या रकमेच्या संबंधात धारणाधिकार असेल अशा तात्काळ देय असलेल्या रकमेचा भाग नमूद करणारी आणि त्याची मागणी करणारी लेखी नोटीस अशा शेअरच्या त्यावेळच्या नोंदणीकृत धारकाला किंवा त्याच्या मृत्यूमुळे किंवा नादारीमुळे अशा शेअरचा हक्कदार झालेल्या व्यक्तीला दिल्यापासून चौदा दिवसांचा कालावधी संपेपर्यंत कोणतीही विक्री करण्यात येणार नाही.

**कंपनीचा ज्यांवर धारणाधिकार आहे अशा शेअर्सची विक्री.**

१९. (१) अशी कोणतीही विक्री अंमलात आणण्याकरता मंडळास, अशा प्रकारे विक्री करण्यात आलेल्या शेअर्सचे त्यांच्या खरेदीदाराकडे हस्तांतरण करण्यासाठी एखाद्या व्यक्तीस प्राधिकृत करता येईल.

(२) खरेदीदाराची अशा कोणत्याही हस्तांतरणात समाविष्ट असलेल्या शेअर्सचा धारक म्हणून नोंदणी करण्यात येईल.

(३) खरेदीच्या पैशाचा विनियोग कसा होतो हे पाहण्यास खरेदीदार बांधील असणार नाही किंवा विक्रीच्या संदर्भातील कार्यवाहीमध्ये कोणतीही अनियमितता किंवा अवैधता असल्यामुळे शेअर्सवरील त्याच्या हक्कात बाधा पोहोचणार नाही.

**विक्रीच्या उत्पन्नाचा विनियोग**

२०. (१) विक्रीचे उत्पन्न कंपनी घेईल व ज्या रकमेच्या संबंधात कंपनीला धारणाधिकार असेल त्या रकमेच्या तात्काळ देय असलेल्या भागाच्या प्रदानासाठी त्याचा विनियोग करील.

(२) कोणतीही रक्कम उरली तर ती ताबडतोब देय नसलेल्या रकमासाठी शेअर्सवर विक्रीपूर्वी असलेल्या धारणाधिकारासारख्या धारणाधिकाराला अधीन राहून विक्रीच्या दिनांकास शेअर्सचा हक्कदार असणाऱ्या व्यक्तीस देण्यात येईल.

## पाच. हस्तांतरण व संक्रमण.

**शेअर्सचे हस्तांतरण व संक्रामण.**

२१. आपले शेअर्स हस्तांतरीत करण्याचा सदस्यांचा हक्क पुढीलप्रमाणे मर्यादित राहील :-

(अ) सदस्यास किंवा हस्तांतरण करण्यास हक्कदार असणाऱ्या अन्य व्यक्तीस, शेअरचे हस्तांतरण केवल राज्यपालाकडून मान्यता देण्यात आलेल्या व्यक्तीकडेच करता येईल.

(ब) पूर्वोक्ताच्या अधिनतेने मंडळास, स्वत:च्या संपूर्ण व अनियंत्रित स्वेच्छाधिकारात, शेअर्सचे कोणतेही हस्तांतरण, त्यासंबंधी कोणतेही कारण न देता, नाकारता येईल.

**हस्तांतरण नोंदवून घेण्याच्या नकाराची नोटीस. नोंदणीकृत धारकांच्या हितसंबंधाखेरीज अन्य कोणत्याही हितसंबंधांना मान्यता देण्यास कंपनी बांधलेली नसणे.**

२२. कोणत्याही शेअरच्या हस्तांतरणाची नोंदणी करण्यास नकार दिल्यास, ते, हस्तांतरणाचा संलेख कंपनीच्या स्वाधीन केल्याच्या दिनांकापासून दोन महिन्यांच्या हस्तांतरितीस व हस्तांतरकास नकाराची नोटीस पाठवील यात अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त मंडळ, सदस्यांच्या नोंदवहीत कोणत्याही शेअरचा धारक म्हणून ज्या व्यक्तीचे नाव असेल अशा व्यक्तीला अशा शेअरचा निर्विवाद मालक असल्याप्रमाणे वागविण्यास हक्कदार असेल. कोणत्याही व्यक्तीने केलेला अशा शेअरवरील कोणताही बेनामी न्यासविषयक दावा किंवा सममूल्य रक्कम किंवा समान अकालिक खर्चाचा दावा किंवा इतर सममूल्य रक्कम किंवा समान दावा किंवा त्यातील हितसंबंध यांना मान्यता देण्यास बांधील असणार नाही. मग त्याला (मंडळाला) त्याबद्दल स्पष्ट किंवा गर्भित नोटीस मिळालेली असो वा नसो.



**हस्तांतरण पत्र करणे.**

२३. कंपनीतील कोणत्याही शेअर्सच्या हस्तांतरणाचा संलेख हस्तांतरक व हस्तांतरिती हे दोघे त्याबाबतीत विहित करण्यात येईल अशा नमुन्यात करतील आणि त्यासंबंधात हस्तांतरितीचे नाव सदस्य नोंदवहीत नोंदले जाईतोपर्यंत हस्तांतरक अशा शेअरचा धारक असल्याचे मानण्यात येईल.

**हस्तांतरण पत्राचा नमुना.**

२४. कंपनीतील शेअर्स, विहित नमुन्यातील संलेखानुसार आणि अधिनियमाच्या आवश्यकतानुसार हस्तांतरित करण्यात येतील.

**हस्तांतरण संलेख कार्यालयात ठेवणे व हक्क पुरावा देणे.**

२५. प्रत्येक हस्तांतरण संलेख हस्तांतरित करण्यात यावयाच्या शेअरपत्रासह नोंदणीकरता कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात ठेवण्यात येईल. तसेच हस्तांतरकाचा शेअर्स हस्तांतरित करण्याचा हक्क किंवा अधिकार शाबित करण्याकरता कंपनी फर्मावील असा पुरावा ठेवावा लागेल. सर्व हस्तांतरण संलेख कंपनीकडून जपून ठेवण्यात येतील, परंतु मंडळ नोंदून घेण्यास नकार देईल असा कोणताही हस्तांतरण संलेख, मागणी करण्यात आल्यावर जो जमा करणाऱ्या व्यक्तीला परत करण्यात येईल, परंतु एखाद्या व्यक्तीला कायद्याप्रमाणे आपल्या नामनिर्देशित व्यक्तींच्या (nominees) कोणत्याही शेअर्सच्या हस्तांतरणाचा हक्क असेल तर, ती जणू काही नोंदणीसाठी येणाऱ्या सामान्य हस्तांतरणातील हस्तांतरिती असल्याप्रमाणे तिची नोंदणी नाकारण्याचा अधिकार मंडळाला असेल.

**कायदा लागू झाल्याने होणारे संक्रमण.**

२६. नियम २१ मध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, जिला विधीच्या प्रवर्तनामुळे कंपनीतील कोणत्याही शेअरवर अधिकार संक्रामित करण्यात आला आहे अशा कोणत्याही व्यक्तीची भागधारक म्हणून नोंद करण्याच्या मंडळाच्या कोणत्याही शक्तीस बाध येणार नाही.

**हस्तांतरणाची फी.**

२७. प्रत्येक हस्तांतरणावर दोन रुपयांहून अधिक असणार नाही अशी फी आकारता येईल आणि हस्तांतरण संलेख नोंदणीकरता सुपूर्द करण्याच्या वेळी त्यासोबत ही फी द्यावी लागेल.

**सदस्य किंवा ऋणपत्रधारक यांची नोंदवही केव्हा बंद ठेवता येईल.**

२८. सदस्य नोंदवही किंवा ऋणपत्रधारक नोंदवहीं ही वर्षभरात एकूण ४५ दिवसांहून अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरता बंद ठेवता येतील. परंतु नोंदवही बंद ठेवण्यासाठी कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय असेल अशा जिल्ह्यांमध्ये प्रसृत होणाऱ्या काही वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीद्वारे किंवा मंडळास योग्य वाटेल अशा अन्य रीतीने किमान ७ दिवसांची नोटीस द्यावी लागेल. कोणत्याही एका वेळी ३० दिवसांहून अधिक असणार नाही इतक्या मुदतीकरताच ती बंद ठेवता येईल.

**धारक कंपनीच्या नामनिर्देशित व्यक्तीने धारण केलेल्या शेअर्सचे हस्तांतरण..**

२९. धारक कंपनीची नामनिर्देशित व्यक्ती म्हणून कोणत्याही व्यक्तीने धारण केलेल्या शेअरच्या बाबतीत अशा कंपनीने त्या व्यक्तीला असा कोणताही शेअर स्वत:कडे किंवा तिने नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीकडे किंवा व्यक्तींकडे हस्तांतरित करण्याची मागणी केली असता किंवा अशी कोणतीही व्यक्ती विकल मनोवृत्तीची झाली किंवा नादार झाली किंवा ती नादार असल्याचे अभिनिर्णित झाले किंवा ती मृत्यूपंथाला लागली किंवा अशी व्यक्ती म्हणजे एखादी कंपनी असेल तर ती

स्वत:हून किंवा न्यायालयाकडून किंवा न्यायालयाच्या पर्यवेक्षणाखाली समापित करण्यात आली तर पुढील तरतुदी अमलात येतील, जसे -

(अ) धारक कंपनी, कोणत्याही वेळी, अशा कोणत्या शेअरच्या हस्तांतरणांची मागणी कंपनीकडे करू शकेल.

ब) नंतर कंपनी, ताबडतोब अशा शेअरधारकाला किंवा शेअरधारक विकल मनोवृत्तीचा झाला असेल त्याबाबतीत त्याच्या नामनिर्देशित व्यक्तीस किंवा अन्य पालकास, किंवा धारक नादार झाला असेल किंवा तो नादार असल्याचे अभिनिर्णीत झाले असेल त्याबाबतीत त्याची संपदा व चीजवस्तु यांच्या अभिहस्तांकितीला किंवा धारक मृत्यू पावला असेल त्याबाबतीत त्याच्या वारसदारांना किंवा वैद्य प्रतिनिधीला किंवा धारक ही कंपनी असेल त्या बाबतीत, पूर्वोक्ताप्रमाणे ती समापित झाली असेल तर तिच्या परिसमापकाला मागणीची लेखी नोटीस देईल आणि त्यानंतरच्या १४ दिवसामध्ये धारक किंवा यथास्थिति समिती किंवा अशा धारकाचा पालक किंवा अभिहस्तांकिती किंवा वारसदार किंवा वैध प्रतिनिधी यांनी अशा शेअरच्या संबंधात धारक कंपनीच्या किंवा तिने नामनिर्देशित केलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे योग्य हस्तांतरणपत्र काढून अशा शेअरच्या संबंधातील प्रमाणपत्रासह ते धारक कंपनीच्या किंवा तिने नामनिर्देशित केलेल्या अन्य कोणत्याही व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या सुपूर्द करील आणि धारक कंपनी किंवा त्याबातीत तिने नामनिर्देशित केलेल्या अशा अन्य व्यक्तीने त्यानंतर कोणत्याही वेळी, अशा शेअरच्या संबंधात अशा धारका करता आणि त्याच्या वतीने किंवा तिच्या संपदाधारकाकरता किंवा त्याच्या वतीने हस्तांतरणाची अंमलबजावणी करील आणि असे हस्तांतरण अशा धारका करता आणि त्याच्या वतीने किंवा त्याच्या संपदाधारकाकरता आणि त्याच्या वतीने यथोचित व योग्यरीत्या अंमलात आल्याचे मानण्यात येईल आणि त्यावर, त्याच्या संपदाधारकाचा अशा शेअरमध्ये असलेला कोणताही हितसंबंध समाप्त होईल आणि अशा शेअरचे भागपत्र पूर्वोक्ताप्रमाणे सुपूर्द करण्यात न आल्यास रद्द होईल आणि निरर्थक व परिणामशून्य ठरेल आणि त्यानंतर त्याऐवजी, कंपनीस धारक कंपनीच्या नावे किंवा ती नामनिर्देशित करील अशा एका किंवा अधिक व्यक्तींच्या नावे नवीन भागपत्र काढता येईल.

**मृत्यू किंवा नादारीमुळे हस्तांतरण.**

३०. सदस्यांच्या मृत्यूमुळे किंवा नादारीमुळे शेअरचा हक्कदार होणाऱ्या व्यक्तीस, संचालक मंडळ वेळोवेळी मागणी करील असा पुरावा हजर केल्यानंतर शेअरच्या संबंधात सदस्य म्हणून नोंदले जाण्याचा किंवा स्वत:ची नोंदणी करून घेण्याऐवजी, मृत किंवा नादार व्यक्ती करू शकली असती असे शेअरचे हस्तांतरण करण्याचा अधिकार प्राप्त होईल. परंतु यापैकी कोणत्याही प्रकरणी, मंडळास, मृत किंवा नादार व्यक्तीने मृत्युपूर्वी किंवा नादारीपूर्वी केलेल्या शेअरच्या हस्तांतरणाला ज्याप्रमाणे नकार देता आला असता किंवा ते निलंबित करता आले असते त्याप्रमाणेच नोंदणी नाकारण्याचा किंवा ती करण्याचा अधिकार असेल.

**नोंदणी होण्यापूर्वी कोणताही अधिकार नसणे.**

३१. धारकाच्या मृत्यूमुळे किंवा नादारीमुळे शेअरचा हक्कदार होणारी व्यक्ती, ती जर त्या शेअरची नोंदणीकृत धारक असती तर जे लाभांश किंवा फायदे मिळण्यास ती हक्कदार असती त्याच लाभांशांना व फायद्यांना ती हक्कदार असेल मात्र, त्या शेअरच्या संबंधात सदस्य म्हणून तिची नोंदणी होण्यापूर्वी, कंपनीच्या सभेच्या सदस्यत्वाच्या नात्याने त्याला शेअरच्या संबंधात प्रदान होणाऱ्या कोणत्याही अधिकाराचा वापर करण्यास ती हक्कदार असणार नाही.



## सहा. शेअर्सचे समपहरण

**रकमेच्या प्रदानाची नोटीस.**

३२. एखाद्या सदस्याने, कोणतीही मागणी केलेली रक्कम किंवा तिचा कोणताही हप्ता ठरलेल्या दिवशी भरण्यात कसूर केली तर संचालक मंडळास त्यानंतर केव्हाही, अशा मागणी रकमेचा कोणताही भाग किंवा हप्ता अदत्त राहिला असेल अशा मागणी रकमेवर उपार्जित झालेल्या व्याजासह ती रक्कम किंवा तिचा हप्ता मुदतीत भरण्यास फर्मावणारी नोटीस अशा सदस्यावर बजावता येईल.

**नोटीशीच्या अटी.**

३३. पूर्वोक्त नोटीशीत -

(अ) त्याद्वारे मागणी करण्यात आलेल्या प्रदानाची रक्कम ज्या दिवशी किंवा ज्या दिवसापूर्वी भरावयाची (नोटीस बजावण्यात आल्यापासून चौदा दिवसापेक्षा आधीची नसेल असा) पुढील दिवस कळवता येईल;
आणि

(ब) अशा प्रकारे कळवण्यात आलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी प्रदान करण्यात न आल्यास, ज्यांच्या संबंधात रकमेची मागणी करण्यात आली असेल असे शेअर्स समपहृत केले जाण्यास पात्र ठरतील असे नमूद करण्यात येईल.

**समपहरण.**

३४. अशा कोणत्याही नोटिशीच्या पूर्वोक्त आवश्यकतांचे पालन करण्यात आले नाही तर ज्याच्या संबंधात नोटीस बजावण्यात आली असेल असा शेअर, त्यानंतर कोणत्याही वेळी, नोटिशीद्वारे फर्मावण्यात आलेला भरणा होण्यापूर्वी समपहरण करण्यासंबंधी ठराव करून मंडळाला समपहृत करता येईल.

**पैसे भरण्याची जबाबदारी.**

३५. (१) ज्या व्यक्तीचे शेअर्स समपहृत झाले असतील अशी समपहृत शेअर्सच्या बाबतीत सदस्य असण्याचे बंद होईल; परंतु, शेअर्स समपहृत झाले असले तरीही समपहरणाच्या दिनांकास त्या शेअर्सच्या संबंधात तिने कंपनीला जेवढा पैसा ताबडतोब द्यावयाचा होता तो सर्व पैसा कंपनीला देण्यास ती जबाबदार असेल.

(२) त्या शेअरच्या संबंधातील असा सर्व पैसा कंपनीला मिळाल्यानंतर अशा व्यक्तीची जबाबदारी समाप्त होईल.

**समपहरणाचे प्रतिज्ञापन**

३६. समपहरणासंबंधी एक लेखी प्रतिज्ञापन काढण्यात येईल. प्रतिज्ञापन काढणारा हा संचालक किंवा व्यवस्थापक असून, नमूद केलेल्या तारखेस, कंपनीतील शेअर रीतसर समपहृत झाला आहे असे त्यात म्हटलेले असेल व असे प्रतिज्ञापन हा, त्या शेअरचा हक्कदार असल्याचा दावा करणाऱ्या सर्व व्यक्तींच्या विरुद्ध त्यात नमूद करण्यात आलेल्या बटनांचा निर्णायक पुरावा असेल.

(२) त्या शेअरची कोणतीही विक्री करण्याच्या किंवा तो निकालात काढण्याच्या वेळी कंपनीला त्याकरता कोणताही मोबदला देण्यात आल्यास तिला तो स्वीकारता येईल आणि जिला तो शेअर विकण्यात आला किंवा जिच्याकडे देऊन तो निकालात काढला अशा व्यक्तीच्या नावे त्या शेअरचे हस्तांतरण करता येईल.

(३) त्या नंतर हस्तांतरितीची (transferee) शेअरचा धारक म्हणून नोंदणी करण्यात येईल.

(४) खरेदीच्या पैशाचा विनियोग कसा केला जातो हे पाहणे हस्तांतरितीवर बंधनकारक असणार नाही तसेच शेअरचे समपहरण विक्री किंवा विल्हेवाट् यांच्या संबंधातील कार्यवाहीमधील कोणताही अनियमितपणा किंवा अवैधता यांच्यामुळे शेअरवरील त्याच्या हक्कात बाधा पोहोचणार नाही.

## सात. भांडवलातील फेरफार

**भांडवल वाढविण्याची शक्ती.**

३७. राज्यपालांच्या मान्यतेस अधीन राहून, मंडळास, सर्वसाधारण सभेत कंपनीची मंजुरी घेऊन, ठरावात विहित करण्यात येईल अशा रकमेपर्यंत भाग भांडवल वाढवता येईल. अशा रकमेची ठरावात विहित केलेल्या रकमेच्या शेअरमध्ये विभागणी करण्यात येईल.

**कोणत्या शर्तीवर नवीन शेअर्स विक्रीस काढले जातील.**

३८. याबाबतीत राज्यपालाकडून देण्यात येतील अशा निदेशांस अधीन राहून, ठरावाद्वारे शेअरची निर्मिती करणारी सर्वसाधारण सभा निदेशित करील अशा अटी व शर्तींवर आणि त्यासोबत दिलेले अधिकार व विशेषाधिकार यांसह नवीन शेअर्स विक्रीस काढण्यात येतील, आणि कोणत्याही निदेश देण्यात आला नसेल त्याबाबतीत, मंडळ निश्चित करील त्याप्रमाणे शेअर्स देण्यात येतील आणि विशेषत: हे शेअर्स हे अधिमान (प्रेफरन्स) शेअर्स असतील, परंतु अधिमान प्रेफरन्स शेअर्स नसेल असा कोणताही शेअर मतदानाचा हक्क प्रदान करणारा किंवा कंपनीत भांडवलावरील लाभांशावर अधिकार पोहोचविणारे किंवा अधिमान (प्रेफरन्स) शेअर्स नसणारे अन्य शेअर धारण करणाऱ्या व्यक्तीला असणाऱ्या अधिकारांशी विसंगत असे अधिकार अन्य प्रकारे देणारे शेअर्स विक्रीस काढण्यात येणार नाहीत.

**मूळ भांडवलातील शेअर्सच्या तुलनेत नवीन शेअर्सना कितपत स्थान देण्यात येईल.**

३९. विक्रीच्या शर्तींद्वारे किंवा या नियमावलीद्वारे तरतूद केली असेल त्याखेरीज, नवीन शेअर्सद्वारे उभारण्यात आलेले कोणतेही भांडवल हे मूळ भांडवलाचा भाग असल्याचे समजण्यात येईल आणि मागणी रकमा व हप्ते यांच्या प्रदानाच्या तसेच हस्तांतरण व संक्रामण धारणाधिकार, मतदान, प्रत्यर्पण (surrender) यांच्या संबंधात व अन्यथा ते यात अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या अधीन राहील.



**नवीन शेअर्स सदस्यांना देऊ करणे.**

४०. प्रत्येक सदस्याने धारण केलेल्या, विद्यमान शेअर्स प्रमाणात, सदस्यांना नवीन शेअर्स देऊ केले जातील आणि सदस्य किती शेअर्सना हक्कदार आहे ती संख्या विनिर्दिष्ट करणाऱ्या नोटीशीद्वारे हा प्रस्ताव करण्यात येईल तसेच प्रस्ताव स्वीकारण्यात न आल्यास तो नाकारला असल्याचे किती मुदतीनंतर समजण्यात येईल ते या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल, आणि अशी मुदत संपल्यानंतर किंवा ज्याला अशी नोटीस देण्यात आली होती अशा सदस्याकडून, त्याला देऊ करण्यात आलेले शेअर्स त्याने नाकारले असल्याची सूचना मिळाल्यावर मंडळास, त्याच्या मते कंपनीला जास्तीत जास्त लाभकारी ठरेल अशा रीतीने, शेअर्सची विल्हेवाट लावता येईल.

**भांडवल कमी करणे इत्यादी.**

४१. कंपनी अधिनियमाची कलमे १०० ते १०४ यांच्या उपबन्धांस तसेच याबाबतीत राज्यपालाकडून देण्यात येतील अशा निदेशांस अधीन राहून कंपनीस, वेळोवेळी, विशेष ठरावाद्वारे, आपले भांडवल कमी करता येईल, भांडवलाची रक्कम चुकती करता येईल आणि नष्ट झालेले, किंवा उपलब्ध मत्तांच्या रूपाने प्रतिरूपण न होणारे किंवा अनावश्यक ठरणारे भांडवल रद्द करता येईल किंवा शेअर्सवरील दायित्व कमी करता येईल किंवा इष्ट वाटेल अशा अन्य कोणत्याही रीतीने आपले भांडवल कमी करता येईल. त्याची नंतर पुन्हा मागणी करण्यात येईल या आधारावर किंवा अन्य प्रकारे ते चुकते करता येईल आणि या अधिनियमाच्या उपबन्धांस अधीन राहून मंडळास शेअर्स परत घेता येतील.

**शेअर्सची उपविभागणी व एकत्रीकरण.**

४२. राज्यपालांच्या मान्यतेस अधीन राहून, कंपनीस, सर्वसाधारण सभेत, वेळोवेळी, आपल्या शेअर्सची किंवा त्यांपैकी कोणत्याही शेअर्सची उपविभागणी करता येईल किंवा ते एकत्रित करता येतील आणि अधिनियमाच्या कलम ९४ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अन्य कोणत्याही शक्तींचा वापर करता येईल आणि या अधिनियमाद्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, कंपनी, अशा कोणत्याही शक्तीचा वापर केल्याची नोटीस निबंधकाकडे दाखल करील.

**फेरबदल करण्याची शक्ती.**

४३. कोणत्याही वेळी, अधिमान (प्रेफरन्स) शेअर्स विक्रीस काढल्यामुळे किंवा अन्यथा भांडवलाची शेअर्सच्या निरनिराळ्या वर्गांमध्ये विभागणी होईल तर, प्रत्येक वर्गाशी संलग्न असणारे सर्व किंवा कोणतेही अधिकार किंवा विशेषाधिकार यांत कंपनी अधिनियमाच्या कलम १०६ व १०७ च्या उपबन्धांच्या अधिनतेने, कंपनी आणि या वर्गाच्या वतीने करार करत असल्याचे समजण्यात येणारी कोणतीही व्यक्ती यांच्यातील कराराद्वारे, फेरबदल करता येतील. त्याचे निराकरण (abrogation) करता येईल किंवा अन्य कार्यवाहीकरता येईल, मात्र असा करार (अ) त्या वर्गाच्या विक्रीस काढलेल्या शेअर्सच्या किमान तीन चतुर्थांश नामित मूल्याच्या धारकांकडून लेखी अनुसमर्थित (ratified) करण्यात आला पाहिजे किंवा (ब) त्या वर्गाच्या भागधारकांच्या स्वतंत्र सर्वसाधारण सभेत त्या वर्गाच्या किमान ३/४ भागधारकांच्या मतांचा पाठिंबा मिळून संमत करण्यात आलेल्या ठरावाद्वारे त्यांना पुष्टी देण्यात आली पाहिजे आणि सर्वसाधारण सभेच्या बाबतीत यात यापुढे अंतर्भूत असलेल्या सर्व तरतुदी अशा प्रत्येक सभेला योग्य त्या फेरफारासाह लागू होतील मात्र त्या वर्गाचे जितके शेअर्स काढण्यात आले असतील त्यांच्या सुमारे एक पंचमांश रकमेचे धारक किंवा तिचे अन्य व्यक्तीमार्फत प्रतिनिधित्व करणारे सदस्य असले तरच त्या सभेची गणपूर्ती होईल. ही नियमावली अस्तित्वातच नसती तर कंपनीला फेरफार करण्याची जी शक्ती मिळाली असती ती कमी करणे हा अर्थ या नियमामध्ये अभिप्रेत नाही.

## आठ. कर्जे घेण्याच्या शक्ती

**कर्जे घेण्याची शक्ती.**

४४. कंपनी अधिनियमाच्या कलम २९२ च्या तरतुदीच्या व राज्यपालांकडून घालण्यात येतील अशा कमाल मर्यादास अधीन राहून, मंडळास, वेळोवेळी कंपनीच्या प्रयोजनार्थ पैशाची कोणतीही रक्कम कर्जाऊ घेता येईल किंवा मिळवता येईल.

**कोणत्या शर्तीवर पैसा कर्जाऊ घेता येईल.**

४५. मंडळास, अशा पैशाची परतफेड करण्याची व्यवस्था स्वत:ला योग्य वाटेल अशा सर्व बाबतीतील अटी व शर्तींवर व अशा रीतीने आणि विशेषत: बंधपत्रे अखंड किंवा विमोचनयोग्य ऋणपत्रे किंवा ऋणपत्र निधी काढून किंवा कंपनीच्या त्यावेळी मागणी करण्यात न आलेल्या भांडवलासह कंपनीच्या (अस्तित्वात असलेल्या किंवा भावी) मालमत्तेच्या पूर्ण किंवा कोणत्याही भागाच्या वचनपत्रावर कोणतेही गहाण, भार किंवा अन्य प्रतिभूती निर्माण करून, करता येईल.

**रोखे हे साधारण शेअरहून अलग अशा रीतीने अभिहस्तांकित करण्यायोग्य असणे**

४६. ऋणपत्रे, ऋणपत्र रोखे, बंधपत्रे किंवा अन्य रोखे जिला ती देण्यात आली असतील अशी व्यक्ती व कंपनी यांच्यातील कोणत्याही साधारण शेअरहून अलग अशा रीतीने अभिहस्तांकन योग्य करता येतील.

**रोखे बट्टा इ. ने किंवा विशेषाधिकारासह विक्रीस काढणे.**

४७. याबाबतीत राज्यपालाकडून देण्यात येतील अशा निदेशांस व कंपनी अधिनियमाच्या कलम ७६ ला अधीन राहून, कोणतीही ऋणपत्रे, ऋणपत्र निधी, बंधपत्रे किंवा अन्य रोखे बट्ट्याने, अधिमूल्याने किंवा अन्य प्रकारे आणि शेअर्सचे विमोचन (redemption) प्रत्यर्पण (surrender) शेअर्स काढणे (drawings) त्यांचे भाग वाटप, संचालकांची नियुकती आणि अधिकार यांसारख्या कोणत्याही विशेषाधिकारांसह विकता येतील.

**व्यक्तींना कोणत्याही पूर्वीच्या भारावर अग्रक्रम नसणे.**

४८. कंपनीच्या त्या मागणी न करण्यात आलेल्या भांडवलावर भार निर्माण करण्यात आला असेल त्याबाबतीत, त्यावरील कोणताही पुढील भार घेणाऱ्या सर्व व्यक्ती, अशा पूर्वीच्या भाराच्या अधिनतेने असा भार घेतील आणि त्याना, भागधारकांना नोटीस देऊन किंवा अन्य प्रकारे अशा पूर्वीच्या भारावर अग्रक्रम मिळण्याचा हक्क असणार नाही.

**क्षतिपूर्ती करता येणे.**

४९. मूलत: कंपनीकडून देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या प्रदानाला संचालक मंडळ किंवा त्यांच्यापैकी कोणताही संचालक किंवा अन्य कोणतीही व्यक्ती व्यक्तिश: जबाबदार ठरल्यास, संचालकांना, राज्यपालांची पूर्व मान्यता घेऊन पूर्वोक्तानुसार (अशा प्रदानाला उत्तरदायी होणाऱ्या संचालकांना किंवा व्यक्तींना अशा दायित्वामुळे होणाऱ्या नुकसानी पासून सुरक्षित करण्यासाठी क्षति पूर्तीद्वारे कंपनीच्या संपूर्ण मत्तेवरील किंवा तिच्या कोणत्याही भागावरील किंवा तिच्यावर परिणाम करणारे कोणत्याही गहाणखत, भार किंवा प्रतिभूती करता येईल किंवा करवता येईल.



## नऊ. सर्वसाधारण सभा

**सर्वसाधारण सभा.**

५०. कंपनी, प्रत्येक वर्षी, अन्य कोणत्याही सभेखेरीज आपली वार्षिक सर्वसाधारण सभा म्हणून एक सर्वसाधारण सभा घेईल आणि अशीसभा बोलावणाऱ्या नोटिशीत त्या सभेचा वार्षिक सर्वसाधारण सभा म्हणून विनिर्देश करील, आणि एका वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेपासून पुढील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या तारखेमध्ये पंधरा महिन्यांहून अधिक कालावधी लोटणार नाही. कंपनीची पहिली वार्षिक सर्वसाधारण सभा, अशी कंपनी निगमित झाल्यापासून अठरा महिन्यांच्या आत घेतली जाईल आणि त्यानंतर, कंपनी अधिनियमाच्या कलम १६६ च्या उपबन्धांना अधीन राहून, कंपनीची वार्षिक सर्वसाधारण सभा, प्रत्येक वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिन्यांच्या आत घेण्यात येईल. प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभा, सार्वजनिक सुटी नसेल अशा दिवशी कामाच्या वेळांमध्ये कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा जेथे नोंदणीकृत कार्यालय असेल अशा शहरातील, नगरातील किंवा गावातील अन्य एखाद्या ठिकाणी घेण्यात येईल.

**विशेष सभा.**

५१. उपरोल्लेखित सर्वसाधारण सभांना 'वार्षिक सर्वसाधारण सभा' असे संबोधण्यात येईल तर इतर सर्वसाधारण सभाना 'विशेष सभा' असे संबोधण्यात येईल.

**मंडळाने विशेष सभा बोलावणे.**

५२. मंडळास, योग्य वाटेल तेव्हा विशेष सभा बोलवता येईल.

**विनंती करण्यात आल्यास विशेष सभा घेणे.**

५३. जेव्हा जेव्हा अधिनियमाच्या कलम १६९ ला अनुसरून लेखी विनंती करण्यात येईल तेव्हा तेव्हा मंडळ विशेष सभा बोलावील.

**विनंती करणाऱ्यांकडून केव्हा विशेष सभा घेण्यात येईल ते.**

५४. लेखी विनंती सादर करण्यात आल्याच्या तारखेपासून २१ दिवसांच्या आत मंडळाने सभा बोलावण्यासाठी कार्यवाही केली नाही तर, अशी सभा अशा लेखी विनंती मिळाल्यापासून ४५ दिवसांच्या आत घ्यावयाची असते. विनंती करणारे किंवा (शेअरचे) मूल्य लक्षात घेऊन त्यांच्यापैकी बहुसंख्य असतील अशा व्यक्ती किंवा अधिनियमाच्या कलम १६९, पोटकलम (६) च्या खंड (ख) द्वारे परवानगी देण्यात आलेल्या व्यक्ती स्वत:च सभा बोलावतील, परंतु अशा प्रकारे बोलवण्यात आलेली कोणतीही सभा, अशी लेखी विनंती सादर करण्यात आल्याच्या तारखेपासून ३ महिन्यानंतर घेण्यात येणार नाही. विनंती करणाऱ्या व्यक्तींनी या नियमावलीन्वये बोलावलेली कोणतीही सभा ही, मंडळाकडून सभा ज्या रीतीने बोलावण्यात येतात त्याच रीतीने शक्यतो बोलावण्यात येईल.

**सभेची नोटीस**

५५. यात यापुढे उल्लेखिलेल्या रीतीने आणि अधिनियमाच्या कलम १७२ द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे ज्यामध्ये जागा, दिवस व सभेची वेळ विनिर्दिष्ट करण्यात आली असेल अशी निदान सात दिवसांची नोटीस विधिद्वारे कंपनीकडून अशी नोटीस मिळण्यास हक्कदार असलेल्या सदस्यांना देण्यात येईल. तसेच विशेष कामकाजाच्या बाबतीत, अधिनियमाच्या कलम १७३ खालील स्पष्टीकरणात्मक निवेदनासह अशा कामकाजाचे सर्वसाधारण स्वरूप या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल. परंतु, कोणत्याही सदस्यास अशी नोटीस देण्याचे चुकून राहून गेल्यामुळे किंवा कोणत्याही सदस्यास अशी नोटीस न मिळाल्यामुळे अशा कोणत्याही सभेत संमत झालेला कोणताही ठराव किंवा झालेले कामकाज अवैद्य ठरणार नाही.

## दहा. सर्वसामान्य सभेचे कामकाज.

**सर्वसामान्य सभेचे कामकाज.**

५६. नफा तोटा पत्रक, ताळेबंद आणि मंडळाच्या व लेखापरीक्षकाचा अहवाल स्वीकारणे व त्यावर विचार करणे. लाभांश घोषित करणे व या नियमावलीच्या अनुसार वार्षिक सर्वसाधारण सभेत पार पाडण्यात येईल असे अन्य कोणतेही कामकाज पार पाडणे हे वार्षिक सर्वसाधारण सभेचे काम असेल. अश सभांमध्ये पार पाडण्यात आलेले इतर सर्व कामकाज व विशेष सभांमध्ये पार पाडण्यात आलेले सर्व कामकाज हे विशेष कामकाज समजण्यात येईल. वार्षिक सर्वसाधारण सभेचे सर्व कामकाज अधिनियमाच्या कलम १७३ नुसार पार पाडण्यात येईल.

**गणपूर्ती.**

५७. सभेला प्रत्यक्ष हजर असलेले सदस्य - यांपैकी एक राज्यपालांचा प्रतिनिधी असेल - मिळून सर्वसाधारण सभेची गणपूर्ती होईल.

**आपला प्रतिनिधी म्हणून कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्याचा राज्यपालकांचा अधिकार.**

५८. (१) राज्यपालांस, ते कंपनीचे भागधारक असतील तोपर्यंत वेळोवेळी, कंपनीच्या सर्व किंवा कोणत्याही सभेत त्यांचे प्रतिनिधित्व करण्याकरता एक किंवा अधिक व्यक्तिंची (अशा व्यक्ती कंपनीचे सदस्य असण्याची गरज नाही) नियुक्ती करता येईल.

(२) या नियमाच्या उप-खंड (१) अन्वये नियुक्त करण्यात आलेली आणि सभेला प्रत्यक्ष हजर असणारी केवळ एकच व्यक्ती ही, मतदान करण्याचा अधिकार असलेली आणि सभेला प्रत्यक्ष हजर राहण्याचा आणि ती कंपनीचा सदस्य म्हणून ज्या अधिकारांचा व शक्तींचा वापर करू शकली असती यात बदली व्यक्ती द्वारा मतदान करण्याच अधिकार समावेश होतो त्याच अधिकार व शक्तींचा वापर करण्यास हक्कदार असलेली सदस्य असल्याचे मानण्यात येईल.

(३) राज्यपालांस, वेळोवेळी, या नियमाच्या उप-खंड (१) अन्वये करण्यात आलेली कोणतीही नियुक्ती रद्द करता येईल व नवीन नियुक्त्या करता येतील.



(४) भारतीय संविधानात उपबन्धित करण्यात आल्याप्रमाणे अधिप्रमाणित करण्यात आलेला राज्यपालांचा आदेश सभेत दाखल करण्यात आल्यास तो अशा कोणत्याही नियुक्तीचा किंवा नियुक्ती रद्द झाल्याचा पुरेसा पुरावा म्हणून कंपनी स्वीकारील.

**सर्वसाधारण सभेचा सभापती.**

५९. मंडळाचा सभापती किंवा त्याच्या अनुपस्थितीत उप-सभापती, प्रत्येक सर्वसाधारण सभेचे अध्यक्षपद स्वीकारण्यास हक्कदार असेल. एखाद्यास सभेत, तिच्या नियत वेळेनंतर अर्ध्या तासाच्या आत, सभापती व उपसभापती हे दोघेही उपस्थित झाले नाहीत तर किंवा ते उपस्थित असतील, परंतु सभापती म्हणून काम करण्याची त्यांची इच्छा नसेल तर, उपस्थित सदस्य दुसऱ्या संचालकांना सभापती म्हणून निवडतील आणि कोणताही संचालक उपस्थित नसेल किंवा उपस्थित असलेले सर्व संचालक सभापती स्वीकारण्याचे नाकारतील तर उपस्थित सदस्य आपल्यापैकी एका सदस्याला सभेचा सभापती म्हणून निवडतील.

**गणपूर्ती न झाल्यास सभा केव्हा विसर्जित करता येईल व केव्हा स्थगित करता येईल.**

६०. सभेच्या नियत वेळेपासून अर्ध्या तासाच्या आत गणपूर्ती न झाल्यास, पूर्वोक्तानुसार अशी सभा विनंतीद्वारे बोलावण्यात आली असेल, तर सभा विसर्जित करण्यात येईल; परंतु अन्य कोणत्याही प्रकरणी ती पुढील आठवड्यातील त्याच दिवसापर्यंत व त्याच वेळेपर्यंत स्थगित करण्यात येईल. सभेची जागा तीच असेल, आणि अशा स्थगनोत्तर सभेला गणपूर्ती न झाल्यास, उपस्थित सदस्य हीच गणपूर्ती असेल आणि ज्याकरता सभा बोलावण्यात आली असेल ते कामकाज पार पाडण्यात येईल.

**सभेत प्रश्नांचा निर्णय कसा करण्यात येईल.**

६१. सभेत सादर करण्यात आलेल्या प्रत्येक प्रश्नाचा प्रथमतः हात वर करून दिलेली मते मोजून निर्णय करण्यात येईल व समान मते पडतील त्याबाबतीत सभापतीस सदस्य म्हणून जे मत किंवा जी मते देण्यास तो हक्कदार असेल त्या व्यतिरिक्त, हात वर करून दिलेल्या मतदानात आणि मतदानास (कोणतेही असल्यास) निर्णायक मत देण्याचा अधिकार असेल.

**मतदानाची मागणी करण्यात आली नसेल याबाबतीत ठराव संमत झाल्याचे निदर्शक म्हणून काय करावयाचे.**

६२. कोणत्याही सर्वसाधारण सभेत, सभेच्या मतास टाकण्यात आलेल्या ठरावाचा हात वर करून निर्णय करण्यात येईल. मात्र अशा हात वर करून द्यावयाच्या मताचा निकाल जाहीर होण्यापूर्वी किंवा जाहीर होताना त्याचवेळी प्रत्यक्ष हजर असलेल्या सदस्याने किंवा बदली व्यक्तीद्वारे किंवा यथोचितरीत्या प्राधिकृत करण्यात आलेल्या प्रतिनिधीद्वारे मतदानाची मागणी करण्यात आली नाही तर असा निर्णय करण्यात येईल; आणि अशा प्रकारे मतदानाची मागणी करण्यात आली नसेल तर, हात वर करून दिलेल्या मतांद्वारे ठराव संमत झाला आहे किंवा एकमताने किंवा विशिष्ट बहुसंख्येने संमत झाला आहे किंवा नामंजूर झाला आहे असे सभापतीने जाहीर करणे आणि कंपनीच्या कार्यवृत्ताच्या पुस्तकात तशी नोंद घेणे हा वस्तुस्थितीचा निर्णायक पुरावा असेल. यासाठी त्या ठरावाच्या बाजूने किंवा विरुद्ध नमूद करण्यात आलेल्या मतांची संख्या किंवा प्रमाण यांच्या पुराव्याची आवश्यकता असणार नाही.

**मतदान**

६३. मतदानाची यथोचितरीत्या मागणी करण्यात आली असता, सभेचा सभापती निदेशित करील अशा रीतीने, अशा वेळी व अशा जागी आणि तात्काळ किंवा कालांतराने किंवा स्थगनानंतर किंवा अन्य प्रकारे ते घेण्यात येईल आणि मतदानाचा निकाल हा ज्या सभेत मतदानाची मागणी करण्यात आली अशा सभेचा तो ठराव असल्याचे मानण्यात येईल. मतदानाची मागणी मागे घेण्यात येईल.

**सर्व साधारण सभा स्थगित करण्याची शक्ती.**

६४. सर्वसाधारण सभेच्या अध्यक्षाला, सभेमध्ये हजर असलेल्या सदस्यांच्या संमतीने त्या त्या वेळी व त्या त्या जागी सभा स्थगित करता येतील, परंतु अशा स्थगित करण्यात आलेल्या कोणत्याही सभेमध्ये, जी सभा स्थगित करण्यात आलेली आहे त्या सभेत न संपलेल्या कामकाजाखेरीज इतर कोणतेही कामकाज करण्यात येणार नाही.

**सभा स्थगित न करता कोणत्या प्रकरणी मतदान घेता येते.**

६५. कोणत्याही सभेच्या अध्यक्षांच्या निवडीबाबत किंवा स्थगिती संबंधातील इतर कोणत्याही प्रश्नाबाबत उचित प्रकारे मतदान घेण्याची मागणी सभेमध्ये करण्यात आली तर असे मतदान सभेमध्ये आणि सभा स्थगित न करता घेण्यात येईल.

**मतदानाची मागणी करण्यात आली असताही कामकाज चालू राहणे.**

६६. मतदानाची मागणी करण्यात आली तरीही ज्या प्रश्नावर मतदानाची मागणी करण्यात आली असेल त्या प्रश्नासंबंधातील असेल व्यतिरिक्त त्या सभेत इतर कोणतेही कामकाज चालू ठेवण्यास प्रतिबंध होणार नाही.

**अध्यक्षाचा निर्णय अंतिम असणे.**

६७. कोणत्याही सभेचा अध्यक्ष हा, अशा सभेत देण्यात आलेल्या प्रत्येक मताची ग्राह्यता ठरवणारा एकमेव निर्णेता असेल. मतदान घेताना हजर असलेला अध्यक्ष हा अशा मतदानाच्या वेळी देण्यात आलेल्या प्रत्येक मताची ग्राह्यता ठरवणारा एकमेव निर्णेता असेल.

## अकरा. सदस्यांची मते

**सदस्यांची मते.**

६८. हात वर करून मतदान करतेवेळी स्वत: उपस्थित असणाऱ्या प्रत्येक सदस्याला एक मत देता येईल आणि मतदानाच्या वेळी स्वत: अथवा बदली व्यक्तीद्वारे अथवा उचित प्रकारे प्राधिकृत करण्यात आलेल्या प्रतिनिधीद्वारे उपस्थित असणाऱ्या सदस्याला त्याने धारण केलेल्या प्रत्येक शेअरगणिक एक मत देता येईल.

**हात वर करून मतदान करताना बदली व्यक्ती द्वारे मतदान करता न येणे.**

६९. जो सदस्या स्वत: हजर नसेल असा कोणताही सदस्य अनुच्छेद ५८ (२) च्या अधीनतेने कोणताही सदस्य मतदानास हक्कदार असणार नाही.

७०. कोणत्याही शेअरांच्या हस्तांतरणाच्या परिणामी पात्र ठरणारी कोणीही व्यक्ती, त्या शेअरांच्या संबंधात, जणू काही ते शेअर धारण करणारी ती नोंदणीकृत धारक आहे अशा रीतीने, कोणत्याही सर्वसाधारण सभेमध्ये मतदना करू शकेल. मात्र ज्या



सभेमध्ये मतदान करण्याचे ठरवले असेल अशी सभा घेण्यात येण्यापूर्वी अथवा यथास्थिती ती सभा स्थगित होण्यापूर्वी निदान बहात्तर तास अगोदर तिने अशा शेअरांसंबंधातील आपल्या अधिकाराबाबत मंडळाची खात्री पटवून दिली पाहिजे. मात्र मंडळाने अशा शेअरांवरील तिचा हक्क किंवा मतदानाचा हक्क आणि त्यासंबंधातील अशी सभा यांस त्यापूर्वीच मान्यता दिलेली असेल.

**संयुक्त धारक.**

७१. कोणत्याही शेअरचे संयुक्त नोंदणीकृत धारक असतील तर त्याबाबतीत, अशा व्यक्तींपैकी कोणत्याही एका व्यक्तीला कोणत्याही सभेत स्वत: बदली व्यक्तीद्वारे, जणू काही ती व्यक्तीच अशा शेअरच्या संबंधात मतदान करण्यास पात्र आहे अशा प्रकारे मतदान करू शकेल, आणि कोणत्याही सभेला अशा संयुक्त धारकांपैकी एकापेक्षा अधिक व्यक्ती स्वत: किंवा बदली व्यक्तीद्वारे हजर असतील तर, हजर असलेल्या एका व्यक्तींपैकी जिचे नाव नोंदवहीवर प्रथम असेल तीच व्यक्ती केवळ अशा शेअरच्या संबंधात मतदान करण्यास पात्र असेल. ज्या मृत व्यक्तीच्या नावे कोणतेही शेअर असतील त्या व्यक्तीचे अनेक मृत्युपत्रव्यवस्थापक किंवा प्रशासक यांना या खंडाच्या प्रयोजनास्तव त्यासंबंधात संयुक्त धारक असल्याचे मानण्यात येईल.

**विकल मनाच्या सदस्यांच्या शेअर संबंधात मतदान.**

७२. विकल मनाच्या किंवा वेडाच्या बाबतीत न्यायनिर्णय देण्याची अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने ज्याच्या बाबतीत आदेश दिलेला असेल अशा सदस्याला त्याच्या समितीमार्फत अथवा इतर कायदेशीर पालकामार्फत मत देता येईल मग ते हात वर करून असो किंवा मतदान करून असो आणि अशा समितीला किंवा पालकाला मतदानाच्या वेळी बदली व्यक्तीद्वारे मत देता येईल.

**बदली व्यक्तींना परवानगी.**

७३. मतदानाच्या वेळी एकतर स्वत: किंवा बदली व्यक्ती द्वारे किंवा उचितप्रकारे प्राधिकृत केलेल्या प्रतिनिधीद्वारे मत देता येईल.

**बदली व्यक्ती नेमण्यासंबंधातील संलेख लेखी असणे.**

७४. एखाद्या सभेला हजर राहण्यास व मतदान करण्यास हक्कदार असणारा सदस्य, एखाद्या सभेस हजर राहण्यासाठी व मतदानाच्या वेळी मत देण्यासाठी कोणाही व्यक्तीला (मग ती सदस्य असो वा नसो) बदली व्यक्ती म्हणून नियुक्त करू शकेल. कोणताही सदस्य एकाच प्रसंगी एकापेक्षा अधिक बदली व्यक्तींची नियुक्ती करणार नाही. बदली व्यक्तीला सभेत बोलता येणार नाही अथवा मतदानाच्या वेळचा अपवाद करता, मत देता येणार नाही. बदली व्यक्ती नेमण्याबाबतचा संलेख लेखी असला पाहिजे व त्यावर नियोक्त्याने अथवा लेखी उचितप्रकार प्राधिकृत करण्यात आलेल्या त्याच्या पॅटर्जीने सही केली पाहिजे अथवा नियोक्ता निगम निकाय असेल तर त्या संलेखावर त्या निगम निकायाला शिक्का असला पाहिजे अथवा त्यावर अधिकाऱ्याने किंवा उचितप्रकारे प्राधिकृत करण्यात आलेल्या ॲटर्नीने सही केली पाहिजे.

**बदली व्यक्ती नेमण्यासंबंधीचा संलेख कार्यालयात देणे.**

७५. बदली व्यक्ती नेमण्याबाबतचा संलेख आणि ज्या अन्वये ह्या दस्तऐवजावर सही करण्यात आली आहे तो मुखत्यारनामा किंवा (असल्यास) इतर प्राधिकारपत्र अथवा त्या प्राधिकारनाम्याची लेखा प्रमाणकाची प्रमाणित प्रत, संलेखात नाव असलेली जी व्यक्ती ज्या सभेत मत देणार असेल त्या सभेच्या वेळेपूर्वी ४८ तास अगोदर कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात देण्यात आली पाहिजे आणि असे करण्यात कसूर झाली तर बदली व्यक्तीबाबतचा संलेख अग्राह्यत समजण्यात येईल.

**बदली व्यक्तिमार्फत दिलेले मत, प्राधीकार रद्द झाल्यानंतरही केव्हा ग्राह्य असावयाचे.**

७६. प्रकर्त्याचा मृत्यू पूर्वीच झाला असला किंवा बदली व्यक्तीचा (मताचा अधिकार) रद्द करण्यात आला असला तरीही, संलेखातील अटीच्या अनुसार करण्यात आलेले मतदान ग्राह्य ठरेल. मात्र प्रकर्त्याच्या मृत्यूची किंवा बदली व्यक्तीच्या (मताचा अधिकार) रद्द केल्याची सूचना सभेपूर्वी कार्यालयाला मिळालेली नसली पाहिजे.

**बदली व्यक्ती नियुक्त करण्यासंबंधीचा नमुना.**

७७. बदली व्यक्ती नेमण्याचा संलेख पुढील नमुन्यात किंवा संचालक मंडळ संमत करील अशा इतर कोणत्याही नमुन्यात असेल.

महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ, मर्यादित

मी ______________________ राहणार ______________________

जिल्हा ______________ महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळाचा सदस्य असून

श्री. ______________________________________________

राहणार ______________________ यांची, दिनांक __________ माहे.

______________________ रोजी घेण्यात येणाऱ्या (यथास्थिती साधारण अथवा असाधारण) सर्वसाधारण सभेत व ती सभा कोणत्याही वेळी स्थगित करण्यात आल्यास त्यासंबंधात माझ्यासाठी व माझ्या वतीने बदली व्यक्ती म्हणून मतदान करण्यास नेमणूक करीत आहे.

स्वाक्षरित दिनांक ______________________ माहे ______________



**मागणी रकमा कंपनीला येणे असताना सदस्य मतदान इत्यादीला पात्र नसणे.**

७८. एखाद्या सदस्याला त्याने धारण केलेल्या शेअर्सच्या संबंधात कोणतीही मागणीची किंवा इतर कोणतीही रक्कम कंपनीला देऊ अथवा प्रदेय असेल तर अशा सदस्याला कोणत्याही सर्वसाधारण सभेला हजर राहण्यास अथवा कोणत्याही प्रश्नाबाबत एकतर स्वत: किंवा बदली सदस्य म्हणून किंवा दुसऱ्या एखाद्या सदस्यासाठी बदली सदस्य म्हणून मतदान करण्यास किंवा मतदानाच्या वेळी मत देण्यास किंव गणपूर्तीमध्ये हिशेबात घेतल्या जाण्यास पात्र असणार नाही.

**मता बाबत आक्षेप घेण्याची वेळ.**

७९. ज्या सभेमध्ये किंवा ज्या मतदानाच्या वेळी मत देण्यात आले ऊसेल त्यावेळचा अपवाद करता, कोणत्याही मताच्या ग्राह्यतेबांबत आक्षेप घेता येणार नाही आणि (सदस्याने) स्वत: किंवा बदली व्यक्तीद्वारे दिलेल्या त्या प्रत्येक मताला अशा सभेमध्ये किंवा मतदानाच्या वेळी परवानगी नाकरण्यात आलेली नसेल तर अशा कोणत्याही सभेच्या क्रिंवा मतदानाच्या सर्व प्रयोजनास्तव ते प्रत्येक मत ग्राह्य मानण्यात येईल.

**विशिष्ट प्रकरणी मंडळाचा लेखी ठराव सर्वसाधारण सभेच्या ठरावासारखा असणे**

८०. मंडळाने संमत केलेल्या ज्या कोणत्याही ठरावाबाबत, यात यापुढे निदेशित करण्यात आलेल्या रीतीने व असा ठराव संमत झाल्यापासून एक महिन्याच्या आत सदस्यांना नोटीस देण्यात येईल, त्या ठरावाला मतदानास पात्र असलेल्या सदस्यांपैकी तीन पंचमांश सदस्यांनी तो ठराव सर्वसाधारण सभेच्या ठरवासारखाच ग्राह्य व प्रभावी असल्याप्रमाणेच समर्थन देवून लेखी स्वरूपात कायम कला पाहिजे; तथापि, कंपनीचा कारभार गुंडाळण्याच्या ठरावाला किंवा ज्या बाबतीत संविधीद्वारे अथवा या नियमान्वये विशेष ठरावाद्वारे कार्यवाही करणे भाग आहे अशा कोणत्याही बाबतीत संमत केलेल्या ठरावाला हा खंड लागू होणार नाही.

## बारा. संचालक मंडळ

**संचालकांची संख्या**

८१. कंपनी अधिनियम, १९५६ च्या कलम २५२ मधील तरतुदींच्या अधीन व कंपनीकडून सर्वसाधारण सभेत अन्यथा निश्चित करण्यात येणार नाही तोपर्यंत, संचालकांची संख्या दोन पेक्षा कमी व अकरा पेक्षा अधिक असणार नाही. संचालकांनी कोणतेही अर्हता शेअर धारण करण्याची आवश्यकता असणार नाही. सुरवातीचे संचालक पुढील व्यक्ती असतील :-

(१) श्री. दामोदर तात्याबा रुपवते

(२) श्री. सुशीलकुमार संभाजी शिंदे

(३) श्री. वसंत बळवंत मंडलेकर

(४) श्री. दामूशेट काशिनाथ केंकरे

(५) श्री. राम नारायण गबाले

संचालकांच्या नेमणुका

८२. (१) राज्यपाल संचालकांच्या नेमणूका करतील.

(२) संचालक मंडळातील सदस्यांपैकी एका संचालकाची नेमणूक राज्यपाल अध्यक्ष म्हणून काम चालवण्यासाठी करतील. राज्यपाल कोणाचीही नेमणूक अध्यक्ष म्हणून करणार नाहीत तोपर्यंत संचालक मंडळच संचालकांपैकी एकाची अध्यक्ष म्हणून काम पाहण्यासाठी नेमणूक करतील.

(३) पहिले संचालक तीन वर्षांसाठी राहतील. त्यानंतर कंपनीच्या प्रत्येक वार्षिक सर्वसाधारण सभेत, त्या त्या वेळी अध्यक्ष म्हणून कामकाज पाहणाऱ्या संचालकासह एकूण संचालकापैकी १/३ संचालक, आणि त्यांची संख्या तीन अथवा तीनच्या पटीत नसेल तर एकतृतियांशाच्या जवळच्या संख्येइतके संचालक आळीपाळीने निवृत्त होतील. अध्यक्षासहीत निवृत्त होणारे संचालक पुनर्नियुक्तीसाठी पात्र असतील.

(४) राज्यपालांना, आपल्या निर्विवाद स्वेच्छानिर्णयांचा वापर करून अध्यक्षातील कोणत्याही संचालकाला कोणत्याही वेळी काढून टाकण्याची शक्ती असेल.

(५) निवृत्तीमुळे, काढून टाकल्यामुळे, राजिनामा दिल्यामुळे, मरण पावल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे, संचालकाचे कोणतेही पद रिक्त झाले असल्यास ते पद भरण्याचा अधिकार राज्यपालांना असेल.

संचालकांचे परिश्रमिक

८३. (१) राज्यपाल मंडळाच्या प्रत्येक सभेला किंवा मंडळाच्या समितीच्या सभेला हजर राहण्यासाठी जी फी निश्चित करतील ती फी प्रत्येक संचालकाचे पारिश्रमिक असेल.

(२) मंडळाला, राज्यपालांच्या मंजुरीने, कंपनीच्या कामासाठी किंवा एखाद्या बैठकीला हजर राहण्यासाठी संचालकाला परवानगी देता येईल व अशा सभांना हजर राहण्यासाठी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा त्याच्या फीसह प्रवासासाठी, राहाण्यासाठी, भोजनासाठी व इतर खर्चासाठी मंडळाला उचित वाटेल अशी रक्कम देता येईल; आणि कोणत्याही संचालकाला, तो नेहमी ज्या शहरात त्याचे वास्तव्य असते त्या शहराखेरीज इतर शहरात कंपनीच्या कामासाठी किंवा सभेला हजर राहण्यासाठी सांगण्यात आले तर कंपनीच्या कामासंबंधात त्याने केलेला कोणताही प्रवसा खर्च किंवा इतर खर्च मिळण्यास किंवा त्या खर्चाची प्रतिपूर्ति त्याला मिळण्यास तो पात्र असेल.

विधान सभा सदस्य किंवा संसद सदस्य हे संचालक म्हणून भरपाई भत्त्याखेरीज इतर कोणत्याही पारिश्रमिकास पात्र नसणे.

८४. लगत पूर्वीच्या नियमामध्ये किंवा इतर कोणत्याही नियमामध्ये कोणतीही गोष्ट अंतर्भूत असली तरीही, राज्य विधानमंडळाच्या किंवा संसदेच्या सदस्याला अध्यक्ष किंवा एक संचालक म्हणून नेमण्यात आले तर त्याला कोणतेही वेतन किंवा पारिश्रमिक देण्यात येणार नाही, परंतु अध्यक्ष अथवा यथास्थिति एक संचालक म्हणून मंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या सभांना हजर राहण्यासाठी किंवा त्या नात्याने इतर कोणतेही कार्य पार पाडण्यासाठी त्याने केलेला व्यक्तीगत खर्च भागवण्यासाठी त्याला प्रवास भत्ता, दैनिक भत्ता व त्याला देय असलेले असे इतर कोणतेही भत्ते देण्यात येतील.



## तेरा. संचालक मंडळाच्या शक्ती

मंडळाकडे निहित कंपनीच्या सर्वसाध शक्ती.

८५. (१) अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने कंपनीच्या संचाल मंडळाला ज्या शक्तींचा वापर करण्यास किंवा ज्या कृति करण्यास प्राधिकृत करण्यात आलेले असेल अशा सर्व शक्तींचा वापर करण्यास व त्या सर्व गोष्टी करण्यास मंडळ पात्र असेल; मात्र, अधिनियमान्वये अथवा इतर कोणत्याही अधिनियमान्वये किंवा अधिसंघ संस्थापना लेख व नियमावली अन्वये अथवा अन्यथा कंपनीने सर्वसाधारण सभेत ज्या शक्तींचा वापर करण्यास किंवा जी कामे करण्यास सांगण्यात अथवा भाग पाडण्यात आले असेल अशा शक्तींचा वापर अथवा अशी कामे मंडळ करणार नाही.

आणखी असे की, अशा कोणत्याही शक्तींचा वापर करताना किंवा अशी कोणतीही कृती अथवा गोष्टी करताना मंडळ अधिनियमात किंवा इतर कोणत्याही अधिनियमात अथवा अधिसंघ संस्थापना लेखा व नियमावली यांत अथवा त्यांच्याशी विसंगत नसलेल्या व तदन्वये उचितप्रकारे करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमात व तसेच कंपनीने सर्वसाधारण सभेत केलेल्या विनियमात त्याबाबतीत अंतर्भूत असलेल्या उपबन्धांच्या अधीन असेल.

(२) कंपनीच्या सर्वसाधारण सभेत करण्यात आलेल्या कोणत्याही विनियमामुळे असा विनिमय करण्यात आला नसता तर मंडळाने पूर्वी केलेली जी कोणतीही कृति विधिग्राह्य ठरली असती अशी कोणतीही कृति या विनियमामुळे विधिबाह्य ठरणार नाही.

मंडळाच्या विनिर्दिष्ट शक्ती.

८६. लगतपूर्वीच्या नियमान्वये प्रदान करण्यात आलेल्या सर्वसाधारण शक्ती आणि या नियमावली अन्वये प्रदान करण्यात आलेल्या इतर शक्ती यांना बाध न येता आणि अधिनियमांच्या उपबन्धांच्या अधीन मंडळाला पुढील शक्ती असतील :-

मालमत्ता संपादन करणे.

(१) कंपनीला योग्य वाटेल अशा किंमतीला व सर्वसाधारण योग्य वाटतील अशा अटींवर व शर्तीवर जी मालमत्ता, तिचे हक्क किंवा विशेषाधिकार संपादन करण्यास कंपनीला प्राधिकार असतील ती मालमत्ता कंपनीसाठी खरेदी करणे, भाडेपट्ट्याने घेणे किंवा अन्य प्रकारे त्यांचे संपादन करणे;

भांडवली स्वरूपाची कामे.

* (२) भांडवली अर्थसंकल्पात समाविष्ट केलेली भांडवली स्वरूपाची कामे, आवश्यक वाटल्यास राज्यपालांच्या संमतीने, मंजूर तरतुदींतून निधींचे पुनर्विनियोजन करून प्राधिकृत करणे;

* (२) (अ) रु. १ लाख पर्यंतची तातडीची लहान बांधकामे भांडवली अर्थसंकल्पात समाविष्ट करण्यात आलेली नसली तरी ती हाती घेण्यास प्राधिकृत करणे;

---

* ही सुधारणा २१-११-१९७९ रोजी भरलेल्या सर्वसाधारण बैठकीत संमत करण्यात आलेल्या ठरावान्वये करण्यात आली.

मालमत्तेसाठी ऋणपत्रे इत्यादींद्वारे प्रदान करणे.

(३) कंपनीने संपादन केलेली कोणतीही मालमत्ता, तिचे हक्क किंवा विशेषाधिकार यासंबंधातील अथवा कंपनीकरीता केलेल्या सेवेबद्दलची रक्कम एकतर पूर्णपणे किंवा अंशत: रोख रकमेत अथवा शेअर, रोखे, ऋणपत्रे अथवा अन्य कर्जरोखे देऊन देणे आणि असे कोणतेही शेअर पूर्ण भरणा केलेल्या रकमेचे किंवा मान्य करण्यात येईल त्यानुसार, त्यांची भरणा केलेली म्हणून जेवढी रक्कम जमा करण्यात आली असेल तेवढ्या रकमेचे असल्याप्रमाणे काढण्यात येतील आणि कोणतेही रोखे, ऋणपत्रे किंवा इतर कर्जरोखे यांची रक्कम एकतर कंपनीच्या सर्व मालमत्तेवर किंवा अशा मालमत्तेच्या कोणत्याही भागावर विनिर्देशपूर्वक भारित करता येईल किंवा तिच्या मागणी न केलेल्या भांडवलावर तशी भारीत करण्यातही येणार नाही;

गहाणाद्वारे संविदा सुनिश्चित करणे.

(४) कंपनीने, गहाणाद्वारे, अथवा कंपनीच्या सर्व मालमत्तेवर किंवा तिच्या काही भागावर आणि त्या त्या वेळच्या मागणी न केलेल्या भांडवलावर भारित ठरवून केलेल्या किंवा मंडळास योग्य वाटेल अशा प्रकारे केलेल्या कोणत्याही संविदांची किंवा वचनाची पूर्ति सुनिश्चित करणे;

अधिकारी इत्यादी नेमणे.

(५) त्यास, वेळोवेळी उचित वाटेल अशा प्रकारे कायम, तात्पुरत्या किंवा विशेष सेवांकरिता व्यवस्थापक, सचिव, अधिकारी, लिपिक, एजंट व सेवक यांची नियुक्ती करणे व स्वेच्छानिर्णयानुसार त्यांना कामावरून काढून टाकणे अथवा निलंबित करणे आणि त्यांच्या शक्ती व कार्ये ठरवणे व त्यांचे वेतन किंवा परिश्रमिक निश्चित करणे व योग्य वाटेल अशा प्रसंगी आणि योग्य अशा रकमेची प्रतिभूति देण्यास भाग पाडणे, मात्र असे की, ज्या पदाचे वेतन मासिक रु. १,८०० पेक्षा अधिक असेल त्यावरील नेमणुका राज्यपालांच्या पूर्वमान्यतेशिवाय करण्यात येणार नाहीत;

विश्वस्त नेमणे.

(६) कंपनीच्या मालकीची किंवा कंपनीचे हितसंबंध गुंतलेले असल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी, अशी कोणतीही मालमत्ता कंपनीसाठी विश्वस्त मंडळ या नात्याने स्वीकारण्यासाठी व धारण करण्यासाठी आणि अशा कोणत्याही विश्वस्त मंडळाच्या संबंधात आवश्यक असतील असे सर्व विलेख व अन्य बाबी निष्पादित करण्यासाठी व धारण करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीची अथवा व्यक्तींची नियुक्ती करणे (मग त्या निजमित असोत वा नसोत) आणि विश्वस्ताच्या किंवा विश्वस्तांच्या पारिश्रमिकाची तरतूद करणे;

कार्यवाही सुरू करणे आणि कार्यवाहीमध्ये बचाव करणे.

(७) कंपनी किंवा तिचे अधिकारी यांच्याकडून अथवा त्यांच्याविरुद्ध किंवा अन्य प्रकारे किंवा कंपनीच्या व्यवहाराशी संबंधित वैध कार्यवाहीत दाखल करणे व ते चालवणे, त्यात बचाव करणे, ते आपसात मिटवणे किंवा ते सोडून देणे आणि त्याचप्रमाणे कंपनीकडून किंवा कंपनीच्या विरुद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही हक्कमागण्यांच्या अथवा मागण्यांच्या रकमांच्या संबंधात तडजोड करणे व त्या देण्यासाठी किंवा त्यांची पूर्ती करण्यासाठी वेळ देणे;

लवादाकडे सोपविणे.

(८) कंपनीकडून किंवा कंपनीविरुद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही हक्कमागणीच्या संबंधातील कार्यवाही लवादाकडे संदर्भित करणे व करण्यात आलेल्या निवाड्याचे पालन करणे व त्यांच्याबाबत कार्यवाही करणे;



(९) कंपनीला देय असलेल्या, पैशाबद्दल व कंपनीच्या हक्कमागण्या व मागण्या यांच्यासंबंधातील रकमांच्या पावत्या, मोचनपत्रे व इतर मुक्तिपत्रे (डिस्चार्जेस) तयार करणे व देणे;

पावत्या देणे.

(१०) बिले, पावत्या, स्वीकृतिपत्रे, पृष्ठांकने, धनादेश, मोचनपत्रे, संविदा व दस्तऐवज यांवर कंपनीच्या वतीने सही करण्यास कोण पात्र आहे ते निश्चित करणे;

(रकमा) स्वीकाराबाबत प्राधिकृत करणे.

(११) मंडळास योग्य वाटेल अशा प्रकारे कंपनीच्या व्यवहारांच्या व्यवस्थापनासाठी वेळोवेळी तरतूद करणे आणि विशेषेकरून मंडळाला योग्य वाटेल अशा अटींवर (पुन: प्रत्यायुक्त करण्याच्या शक्तीसह) शक्ती प्रदान करून कोणत्याही व्यक्तीला कंपनीच्या मुख्यत्यार किंवा एजंट नेमणे;

मुखत्यार नेमणे.

(१२) राज्यपालांकडून याबातीत कोणतेही सर्वसाधारण अथवा विशेष निदेश देण्यात आले असतील तर त्यांस अधीन राहून, रोख्यांमध्ये, किंवा मागणीयोग्य ठेव ठेवण्यासाठी व चालू खाते उघडण्यासाठी मंडळाकडून स्पष्टपणे ठरवण्यात येईल अशा कोणत्याही इतर अनुसूचित बँकेमध्ये किंवा बँकांमध्ये गुंतवणूक करणे आणि अशा गुंतवणुकीनंतर कंपनीच्या अधिसंघ संस्थापन लेखानुसार व मंडळाला योग्य वाटेल अशा प्रकारे (या कंपनीचे शेअर्स असलेल्या) कंपनीच्या कोणत्याही रकमेबाबत कार्यवाही करणे वेळोवेळी अशा गुंतवणुकीत बदल करणे अथवा त्या काढून घेणे;

पैसे गुंतवणे.

(१३) राज्यपालांच्या संमती संबंधातील तरतुदींना अधीन राहून, कंपनीला योग्य वाटेल अशा प्रतिफलार्थ (त्या धंद्याच्या बदल्यात अथवा मालमत्तेच्या किंवा तिच्या काही भागाच्या बदल्यात) विशेषेकरून कंपनीच्या उद्दिष्टांशी पूर्णपणे किंवा अंशत: जुळणाऱ्या इतर कोणत्याही कंपनीचे शेअर, ऋणपत्रे किंवा रोखे घेऊन, कंपनीचा धंदा अथवा तिची मालमत्ता असल्यास ती किंवा तिचा काही भाग यांची विक्री करणे किंवा ती निकालात काढणे;

धंदा किंवा मालमत्ता विकणे अथवा तिचे हस्तांतरण करणे.

(१४) कंपनीच्या नावे व तिच्या वतीने शासनाची पूर्वसंमति मिळवून, कंपनीच्या फायद्यासाठी कोणतेही दायित्व स्वीकारू शकेल किंवा स्वीकारणार असेल असा कोणताही संचालक किंवा अन्य व्यक्ती, यांच्याकरीता मंडळाला योग्य वाटेल अशा प्रकारे कंपनीच्या मालमत्तेची (विद्यमान व भावी) गहाणखाते, करून देणे आणि अशा गहाणखतामध्ये विक्रीबाबतची शक्ती मान्य करण्यात येतील अशा प्रकारच्या इतर शक्ती, प्रसंविदा व तरतुदी यांचा समावेश असेल;

क्षतिपूर्तीच्या मार्गाने गहाण खाते करणे.

(१५) राज्यपालांच्या मान्यतेच्या अधीन, कंपनीने नोकरीत घेतलेल्या कोणाही व्यक्तीला, एखाद्या विशिष्ट व्यवहारात झालेल्या नफ्यावर कमिशन देणे अथवा कंपनीच्या सर्वसाधारण नफ्यातील हिस्सा देणे आणि असे कमिशन अथवा नफ्यातील हिस्सा कंपनीच्या चालू खर्चाचा भाग आहे असे मानण्यात येईल;

टक्केवारी देणे.

(१६) कंपनीचा व्यवहार तिचे अधिकारी व सेवक यांच्यासंबंधातील विनियमनसाठी वेळोवेळी उपविधी करणे, त्यांत बदल करणे अथवा त्यांचा निरास करणे;

उपविधि तयार करणे.

**स्थानिक मंडळ स्थापन करणे.**

(१७) महाराष्ट्र राज्यातील किंवा महाराष्ट्र राज्याबाहेर कोणत्याही विनिर्दिष्ट ठिकाणी कंपनीचे कोणतेही व्यवहार करण्यासाठी वेळोवेळी व कोणत्याही वेळी स्थानिक मंडळ स्थापन करणे व अशा स्थानिक मंडळात कोणत्याही व्यक्तींची नेमणूक करणे व त्यांचे पारिश्रमिक निश्चित करणे. अशा प्रकारे नेमलेल्या कोणत्याही व्यक्तींस त्यांच्या शक्तींच्या व्यतिरिक्त कोणत्याही शक्ती, प्राधिकार व स्वेच्छानिर्णय शक्ती वेळोवेळी व कोणत्याही वेळी प्रत्यायोजित करणे आणि मागण्या करणे; आणि अशा कोणत्याही स्थानिक मंडळाच्या त्या त्या वेळच्या सदस्यांस किंवा त्यांच्यापैकी कोणाही व्यक्तीस मंडळातील रिक्त पद भरण्यास आणि अशी रिक्त पदे असली तरीही कामे पार पाडण्यास प्राधिकृत करणे आणि अशी कोणतीही नेमणूक किंवा शक्तींचे प्रत्यायोजन, संचालक मंडळास उचित वाटतील अशा अटींवर व अशा शर्तींच्या अधीन करता येतील आणि अशा प्रकारे नेमणूक करण्यात आलेल्या कोणत्याही सदस्यास, संचालक मंडळाला काढून टाकता येईल अथवा अशा प्रकारे प्रत्यायुक्त करण्यात आलेली कोणतीही शक्ती शून्यवत् करता येईल अथवा त्यात बदल करता येईल;

**संविदा इत्यादी करणे.**

(१८) कंपनीच्या नावे अथवा तिच्या वतीने, कंपनीकरीता किंवा उपरोक्त बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात अथवा कंपनीच्या प्रयोजनार्थ, अन्यथा त्यांना इष्ट वाटत असतील असे सर्व परक्राम्य संलेख आणि संविदा करणे, अशा सर्व संविदा विखंडीत करणे व त्यात फेरफार करणे आणि (असे संलेख व संविदा) निष्पादित करणे व अशा सर्व कृति, कामे आणि गोष्टी करणे;

**शक्ती प्रत्यायुक्त करणे.**

(१९) त्या त्या वेळी निहित करण्यात आलेल्या सर्व किंवा काही शक्ती, प्राधिकार किंवा विशेषाधिकार, अंतिम नियंत्रण व प्रदाधिकार मंडळाकडे राहण्याच्या अधीनतेने, प्रत्यायोजित करणे;

**नियम करण्याच्या मंडळाच्या विनिर्दिष्ट शक्ती.**

८७. वरील तरतुदींच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, पुढील बाबी राज्यपालांच्या निर्णयासाठी राखून ठेवील :-

(१) कर्मचाऱ्यांच्या सेवाशर्ती, त्यांचा भविष्य निर्वाह निधी नियमित करणारे आणि इतर नियम करणे, राखीव व विशेष निधी निर्माण करणे;

(२) कंपनीचा उपक्रम संपूर्णपणे किंवा जवळजवळ संपूर्ण विकणे, तो भाडेपट्ट्याने देणे किंवा त्यांची अन्यप्रकारे व्यवस्था लावणे.

(३) दुय्यम कंपनी स्थापन करणे.

## चौदा. व्यवस्थापन संचालक

**व्यवस्थापन संचालकांची नेमणूक**

८८. (१) राज्यपालांना (राज्य विधानमंडळाचे व संसदेचे सदस्य असतील त्या व्यतिरिक्त इतर व्यक्तींना), संचालक मंडळाचे नियंत्रण व पर्यवेक्षण यांच्या अधीन कंपनीचा कारभार चालवण्यासाठी व त्याचे व्यवस्थापन पाहण्यासाठी, त्यांना योग्य



वाटेल अशा मुदतीसाठी व शर्तींवर व्यवस्थापन संचालक आणि अथवा व्यवस्थापन सह-संचालक म्हणून, संचालक मंडळातील कोणत्याही एक अथवा अनेक व्यक्तींची नेमणूक करता येईल. मंडळ अशा प्रकारे नेमण्यात आलेल्या व्यवस्थापन संचालकाला किंवा सह-संचालकाला, कंपनीचा कारभार चालवण्याच्या संदर्भात मंडळाकडून त्याला/त्यांना विनिर्दिष्टपणे प्रत्यायोजित केलेल्या व अधिनियमान्वये संचालक मंडळाला सर्वसाधारण सभेत करणे आवश्यक नसलेल्या शक्ती व विवेकाधिकार यांचा वापर करण्यास प्राधिकृत करू शकेल.

(२) व्यवस्थापन संचालकाला किंवा संचालकांना राज्यपालांकडून निश्चित करण्यात येईल तितके वेतन व भत्ते देण्यात येतील.

(३) व्यवस्थापन संचालक, रजेवर असल्याने किंवा अन्य कारणाने अनुपस्थित असेल तर, मंडळाला राज्यपालाच्या पूर्वानुमतीने कंपनीच्या कोणत्याही संचालकाला अथवा प्रमुख अधिकाऱ्याला त्याची सर्व अथवा काहीकामे पार पाडण्यास शक्ती प्रदान करता येईल; मात्र जेव्हा अशी अनुपस्थिती तीन महिन्यापेक्षा अधिक असण्याची शक्यता नसेल तेव्हा राज्यपालांची पूर्वानुमति आवश्यक नसेल.

## पंधरा. वित्त सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी

**वित्त सल्लागार व मुख्य लेखा अधिकारी यांची नेमणूक.**

८९. राज्यपाल, उचित वाटेल अशा अटींवर व पारिश्रमिकावर वित्त सल्लागार व मुख्य लेखा अधिकाऱ्याची नेमणूक करू शकतील आणि वेळोवेळी ते त्याला त्या पदावरून काढू शकतील व त्यांच्या जागी दुसऱ्याची नेमणूक करू शकतील.

## पंधरा. सचिव

९०. मंडळ, उचित वाटेल अशा मुदतीसाठी व पारिश्रमिकावर व शर्तींवर सचिवाची नेमणूक करू शकेल आणि अशा प्रकारे नेमणूक करण्यात आलेल्या सचिवाला मंडळ पदावरून दूर करू शकेल.

## सोळा. कार्यवृत्ते

**पुस्तकांच्या स्वरूपात कार्यवृत्ते तयार करण्याची व्यवस्था मंडळाने करणे.**

९१. कंपनीच्या सर्वसाधारण सभा व तसेच अधिकाऱ्यांच्या सर्व नेमणूका आणि संचालकांच्या व समित्यांच्या सर्व बैठकीतील कार्यवाही व त्या बैठकीतील उपस्थिती आणि अशा बैठकांमध्ये झालेले कामकाज याबाबतची उचित कार्यवृत्ते तयार करविण्याची व्यवस्थामंडळ, अधिनियमाच्या कलम १९३ मधील तरतुदींनुसार, करील आणि अशा कोणत्याही सभेचे कार्यवृत्त, अशी सर्वसाधारण सभा समाप्त झाल्यापासून १४ दिवसांच्या आत अशा सभेच्या अध्यक्षांनी अधिनियमांच्या कलम १९३ पोट-कलम १ क (ख) च्या उपबन्धांच्या अनुसार अशा सभेच्या अध्यक्षांनी व संचालक समितीच्या संचालकांच्या कार्यवृत्ताच्या बाबतीत त्या सभेच्या अध्यक्षांनी स्वाक्षरित करणे अभिप्रेत असेल तर ते, त्यामध्ये नमूद केलेल्या तथ्यांच्या संबंधात आणखी कोणताही पुरावा आवश्यक न ठरणारा निर्णायक पुरावा असेल.

## सतरा. मुद्रा लावणे

मुद्रा.

९२. (१) संचालक मंडळाने ठराव करून दिलेल्या प्राधिकाराखेरीज (शेअर प्रमाणपत्राचा अपवाद करता) व किमान एका संचालकाच्या उपस्थितीखेरीज कोणत्याही संलेखावर मुद्रा लावण्यात येणार नाही; मात्र कायद्याने आवश्यक ठरेल त्यावेळी संचालक मंडळ ठराव करून व्यवस्थापन संचालकाला अथवा कोणत्याही संचालकाला कोणत्याही संलेखावर (शेअर प्रमाणपत्राचा अपवाद करून) मुद्रा लावण्यास प्राधिकृत करू शकेल. शेअर प्रमाणपत्राच्या बाबतीत, (१) दोन संचालक आणि (२) सचिव अथवा या प्रयोजनास्तव मंडळ प्राधिकृत करील अशी दुसरी कोणतीही व्यक्ती यांच्या उपस्थितीत मुद्रा लावण्यात येईल.

(२) शिक्का सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्यासाठी मंडळ तरतूद करील.

## अठरा. संचालकांच्या अनर्हता

संचालकांची अनर्हता

९३. संचालकाचे पद, -

(अ) तो विकल मनाचा आहे असे सक्षम अधिकारिता न्यायालयास आढळून आल्यास;

(ब) दिवाळखोर म्हणून अभिनिर्णित करण्यात यावे म्हणून त्याने अर्ज केल्यास;

(क) तो दिवाळखोर असल्याबद्दल न्यायनिर्णय देण्यास आल्यास;

(ड) कोणत्याही अपराधासाठी भारतातील कोणत्याही न्यायालयाने त्याला दोषी ठरवले असेल व त्या संबंधात त्याला सहा महिन्यापेक्षा कमी नसेल एवढ्या कालावधीची कारावासाची शिक्षा झालेली असल्यास;

(इ) त्याने धारण केलेल्या कंपनीच्या शेअर्सच्या संबंधात मग त्याने एकट्याने किंवा इतरांसमवेत संयुक्तपणे धारण केलेले असोत कोणत्याही मागणीची रक्कम तिच्या प्रदानासाठी निश्चित केलेल्या अखेरच्या तारखेनंतर सहा महिन्याच्या आत भरण्यात त्याने कसूर केल्यास;

(फ) मंडळाकडून अनुपस्थित राहण्याची परवानगी न घेता मंडळाच्या लागोपाठच्या तीन सभांना किंवा तीन महिन्यांच्या सलग कालवधीतील सर्व सभांना यांपैकी जो कालावधी कमी असेल त्या कालावधीत तो गैरहजर राहिल्यास;

(ग) त्याने अथवा तो ज्या पेढीमध्ये भागीदार असेल त्या पेढीने किंवा ज्या कोणत्याही खाजगी कंपनीचा तो संचालक असेल त्या कंपनीने, कंपनीकडून कर्ज घेतले अथवा कर्जासाठी कोणतीही हमी अथवा जमीन घेतल्यास;

(द) अधिनियमाच्या कलम २९९ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, कंपनीद्वारे किंवा कंपनीच्या वतीने करण्यात आलेल्या कोणत्याही संविदांमधील अथवा संव्यस्थेमधील त्याचे संबंध किंवा हितसंबंध याचे स्वरूप प्रकट करण्यास त्याने कसूर केल्यास;



(आय) अधिनियमाच्या कलम २०३ अन्वये न्यायालयाच्या आदेशानुसार तो अनर्ह ठरल्यास;

(जे) अधिनियमाच्या कलम २८४ अन्वये त्याला काढून टाकण्यात आल्यास;

(के) कंपनीशी केलेल्या कोणत्याही संविदेतील नफ्यात त्याचा संबंध अथवा सहभाग असल्यास;

रिक्त होईल मात्र, कोणताही संचालक, असेल त्या कंपनीच्या बरोबर किंवा त्या कंपनीकरीता ज्या कोणत्याही कंपनीने संविदा केलेली असेल अथवा कोणतेही काम केलेले असेल त्या कंपनीचा तो सदस्य झाला असेल तर त्या कारणास्तव, आपले पद सोडणार नाही, तथापि, अशा कोणत्याही संविदेच्या संबंधात किंवा कामासंबंधात त्याला मतदान करता येणार आणि त्याने मत दिले तर ते विचारात घेतले जाणार नाही.

वरील उपखंड (क), (ड) व (आय) यांत निर्दिष्ट करण्यात आलेली निरर्हता, - पुढील गोष्टी पूर्ण होईपर्यंत अंमलात येणार नाही;

(अ) न्याय निर्णय, शिक्षा किंवा आदेश यांच्या तारखेपासून तीस दिवसपर्यंत;

(ब) उपरोक्त तीस दिवसांच्या आत न्यायनिर्णय किंवा दोषसिद्धी यांच्या परिणामी झालेली शिक्षा किंवा आदेश यांविरुद्ध कोणतेही अपील अथवा विनंती अर्ज करण्यात आला असला तर असे आणि किंवा विनंती अर्ज यांचा निकाल करण्यात आल्याच्या तारखेनंतर सात दिवसांची मुदत संपेपर्यंत; अथवा

(क) उपरोक्त सात दिवसांच्या आत, न्यायनिर्णय, शिक्षा, दोषसिद्धी अथवा आदेश यांविरुद्ध आणखी अपील अथवा विनंती अर्ज करण्यात आला आणि असे अपील अथवा विनंतीअर्ज मान्य करण्यात आल्यास, निरर्हता दूर होणार असेल तर, असे आणखी केलेले अपील अथवा विनंती अर्ज यांचा निकाल करण्यात येईपर्यंत; प्रभावी ठरणार नाही.

## एकोणीस. संचालक मंडळाचे कामकाज

प्रश्नांवर निर्णय कसे घ्यावयाचे हे ठरवण्यासाठी व्यवस्थापन संचालकाला सभा बोलावता येईल.

९४. व्यवस्थापन संचालक किवा त्याच्या अनुपस्थितीत सचिव कोणत्याही वेळी संचालक मंडळाची सभा बोलावू शकेल. कोणत्याही सभेत उद्भवणाऱ्या प्रश्नांबाबत बहुमताने निर्णय घेण्यात येईल. अध्यक्षाला दुसरे अथवा निर्णायक मत असेल.

मंडळाच्या सभा व सभांच्या नोटीशी

९५. कंपनीचे कामकाज पार पाडण्यासाठी, प्रत्येक तीन कॅलेंडर महिन्यांतून निदान एकदा संचालक मंडळाची सभा घेण्यात येईल व अधिनियमाच्या कलम २८५ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे प्रत्येक वर्षी अशा निदान चार सभा तरी घेण्यात येतील.

कंपनीच्या संचालक मंडळाच्या सभेची लेखी नोटीस त्या त्या वेळी भारतात असलेल्या प्रत्येक संचालकाला आणि भारतातील त्याच्या नेहमीच्या पत्त्यावर आणि इतर संचालकांपैकी प्रत्येक संचालकाला देण्यात येईल.

**सभेसाठी गणपूर्ती.**

९६. (१) कंपनीच्या संचालक मंडळाच्या सभेसाठीची गणपूर्ति मंडळाच्या एकूण संख्येच्या (अधिनियमांन्वये निश्चित करण्यात आलेली एकूण संख्या व तिच्या एक तृतीयांश या संख्येतील अपूर्ण संख्या पूर्ण एक एवढी धरण्यात येईल.) एक तृतीयांश किंवा दोन संचालक यांपैकी जी संख्या अधिक असेल एवढी असेल; परंतु कोणत्याही वेळी हितसंबंधी संचालकांची संख्या एकूण संख्येच्या दोन तृतीयांशापेक्षा अधिक असेल किंवा दोन तृतियांश एवढीच असेल त्यावेळी उरलेल्या संचालकांची हितसंबंध नसलेल्या संचालकांची संख्या ही दोनपेक्षा कमी नसेल तर अशावेळी ती गणपूर्तीची संख्या असेल.

* (२) गणपूर्ती अभावी संचालक मंडळाची सभा होऊ शकत नसेल तेव्हा ती सभा तहकूब होईल आणि ती तहकूब सभा त्याच दिवशी त्याच स्थळी अर्ध्या तासाने भरविण्यात येईल. या तहकूबीच्या सभेला गणपूर्ती आवश्यकता नाही.

**गणपूर्तीच्या शक्ती.**

९७. त्या त्या वेळच्या संचालक मंडळाच्या सभेला गणपूर्ती होईल एवढे संचालक हजर असतील तर ती सभा, कंपनीच्या नियमावहीद्वारे अथवा अन्वये त्या त्या वेळी संचालक मंडळाला निहित केलेल्या व सर्वसाधारणत: त्यास वापरण्याजोगे सर्व किंवा कोणतेही प्राधिकार, शक्ती अथवा विवेकाधिकार यांचा वापर करण्यास सक्षम असेल.

**संचालक मंडळाच्या सभेचे अध्यक्ष आणि उपाध्यक्ष.**

९८. राज्यपाल, संचालक मंडळाच्या सभांसाठी संचालकातून एकाला अध्यक्ष व दुसऱ्या एखाद्याला उपाध्यक्ष म्हणून नामित करतील व किती कालावधीकरिता तेही पदे धारण करावीत ते निश्चित करतील. जर कोणत्याही सभेला अध्यक्ष उपस्थित नसेल तर उपाध्यक्ष म्हणून सभेचे कामकाज पाहील. जर कोणत्याही सभेमध्ये, अध्यक्ष व उपाध्यक्ष हे दोघषही सभा सुरू झाल्याच्या वेळेपासून ३० मिनिटांच्या आत सभेला हजर झाले नाहीत तर उपस्थित असलेले संचालक त्यांच्यापैकी एकाला सभेचा अध्यक्ष म्हणून निवडू शकतील.

**समितीला शक्तीचे प्रत्योयाजन**

९९. संचालक मंडळ, अधिनियमाच्या कलम २९२ व २९७ मधील उपबन्धांच्या अधीनतेने त्यास योग्य वाटेल अशा सदस्यांचा किंवा सदस्यांच्या मिळून बनलेल्या समितीकडे कोणत्याही शक्ती प्रत्यायोजित करू शकेल; अशा प्रकारे तयार करण्यात आलेली कोणतीही समिती, अशा रितीने तिच्याकडे प्रत्यायोजित केलेल्या शक्तींचा वापर करताना, मंडळाकडून तिच्यावर लादण्यात आलेले कोणतेही विनियम अनुसरील अशा समितीचे कामकाजाचे कार्यवृत्त संचालक मंडळाच्या नंतरच्या सभेपुढे ठेवण्यात येईल.

---

* ही सुधारणा ६-११-१९८२ रोजी भरलेल्या सर्वसाधारण बैठकीत संमत करण्यात आलेल्या ठरावान्वये करण्यात आली.



**समित्यांच्या सभेचा अध्यक्ष.**

१००. अध्यक्ष अथवा उपाध्यक्ष नामित करण्यात आले नसतील अथवा कोणत्याही सभेला अशा प्रकारे नामित केलेला अध्यक्ष किंवा उपाध्यक्ष सभेच्या नियोजित वेळेपासून ३० मिनिटांच्या आत सभेला हजर राहिला नाही तर सभेला हजर असलेले सदस्य, त्यांच्यापैकी एकाची सभेचा अध्यक्ष म्हणून निवड करू शकतील.

**नेमणूक इत्यादी दोषपूर्ण असली तरीही संचालकांच्या समितीची सर्व कामे विधिग्राह्य असणे.**

१०१. मंडळाच्या किंवा संचालक समितीच्या कोणत्याही सभेत किंवा संचालक म्हणून काम पाहणाऱ्या कोणाही संचालकाकडून करण्यात आलेली सर्व कामे, नंतर अशा संचालकांच्या किवा उपरोक्त प्रमाणे काम पाहणाऱ्या व्यक्तीच्या नेमणुकीत काही दोष होता किंवा ते सर्वजण अथवा त्यांच्यापैकी कोणीही निरर्ह होता असे आढळून आले तरी, अशा प्रत्येक व्यक्तीची उचितप्रकारे नेमणूक करण्यात आलेली होती व ती संचालक म्हणून पात्र होती असे समजून, विधिग्राह्य समजण्यात येतील. तथापि, या नियमावलीतील कोणत्याही गोष्टीमुळे, एखाद्या संचालकाचा नेमणुकीनंतर त्याची अशी नेमणूक विधिबाह्य होती किंवा ती समाप्त करण्यात आली असे निदर्शनास आणून देण्यात आले तर, त्यांच्याकडून करण्यात आलेली कामे विधिग्राह्य ठरत असल्याचे मानण्यात येणार नाही.

**संचालक मंडळाच्या सभेशिवाय ठराव विधिग्राह्य असणे.**

१०२. सर्व संचालकांनी स्वाक्षरित केलेला लेखी ठराव, अधिनियमाच्या कलम २८९ च्या अधीनतेने, तो जणू काही संचालक मंडळाकडून उचितप्रकारे बोलावण्यात व घटित करण्यात आलेल्या सभेत संमत करण्यात आलेल्या ठरावाप्रमाणेच विधिग्राह्य व प्रभावी असेल.

## वीस. राखीव निधी

**राखीव निधी**

१०३. मंडळ, कोणत्याही अधिलाभांशाची शिफारस करण्यापूर्वी, आकस्मिक खर्च भागवण्यासाठी किंवा अभिलाभांशाचे समाजीकरण करण्यासाठी किंवा कंपनीच्या मालमत्तेची दुरुस्ती करण्यासाठी, तिच्यात सुधारणा करण्यासाठी किंवा तिचे परिरक्षण करण्यासाठी आणि कंपनीच्या हितसंबंधांना पोषक ठरतील असे, मंडळाच्या निरपवाद निर्णयाधिकाराच्या अनुसार वाटेल अशा इतर प्रयोजनांसाठी, कंपनीच्या नफ्यातून योग्य वाटतील एवढ्या रकमा राखीव निधी म्हणून बाजूला काढून ठेवू शकेल आणि अशा प्रकारे बाजूला ठेवण्यात आलेल्या निरनिराळ्या रकमा त्यास योग्य वाटेल अशा रितीने वेळोवेळी (कंपनीच्या शेअर व्यतिरिक्त इतर गोष्टीत) गुंतवणुकीमध्ये गुंतवू शकेल; अशा गुंतवणुकींच्या संबंधात व्यवहार करू शकेल किंवा त्यामध्ये बदल करू शकेल आणि कंपनीच्या फायद्यासाठी सर्व अथवा त्यांच्या काही भागाची विक्री करू शकेल आणि मंडळाला योग्य वाटेल अशा प्रकारे राखीव निधींची विशेष निधीमध्ये विभागणी करू शकेल आणि राखीव निधी किंवा त्यांचा भाग कंपनीच्या व्यवहारात असे राखीव निधी इतर मत्तांपासून वेगळी न ठेवता वापरू शकेल.

## एकवीस. लाभांश

**लाभांश.**

१०४. लाभांश देण्यासाठी उपलब्ध असलेली कंपनीच्या नफ्याची रक्कम, त्यासंबधात या अधिलेखाद्वारे निर्माण करण्यात आलेल्या किंवा निर्माण करण्यात प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही विशेष हक्कांच्या अधीन व राखीव निधीला लागू असणाऱ्या या अधिलेखामधील तरतुदीच्या अधीन, राज्यपालांच्या संमतीने, सदस्यांना धारण करण्यात येणाऱ्या भांडवलाच्या रकमेच्या त्या त्या प्रमाणात विभागणी करण्यायोग्य असेल; परंतु (उपरोक्तप्रमाणे अधीन राहून) एखाद्या शेअरच्या भरणा केलेल्या कोणत्याही भांडवलावर ज्या मुदतीसाठी असा लाभांश घोषित करण्यात आला असेल त्यासाठीच केवळ असा शेअर धारक प्रदानाच्या तारखेपासून अशा लाभांशाचा संविभाजित रकमेचा हिस्सा मिळण्यास पात्र असेल.

**आगाऊ भरणा केलेले भांडवल.**

१०५. कोणत्याही शेअरच्या संबंधातील रकमेची मागणी करण्यात येण्यापूर्वीच त्या रकमेवर व्याज मिळेल या अपेक्षेने भांडवलाचा भरणा करण्यात आला असेल तर अशा भांडवलावर ते व्याजी असेल तरीही नफ्यामध्ये भागीदार होण्याचा हक्क प्राप्त होत नाही.

**लाभांशाची घोषणा.**

१०६. कंपनी, सर्वसाधारण सभेत, नफ्या संबंधातील सदस्याचे हक्क व त्यांतील त्यांचे हितसंबंध यांनुसार त्यांना द्यावयाचा लाभांश घोषित करू शकेल व अशा प्रदानाबाबत वेळ निश्चित करू शकेल, परंतु लाभांशाची कोणतीही रक्कम ही मंडळाला शिफारस केलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

**नफ्यामधून लाभांश देणे व त्यावर व्याज न मिळणे.**

१०७. कंपनीला त्या वर्षात किंवा इतर कालावधीत झालेला नफा किंवा कंपनीचा वाटप न झालेला नफा यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही रकमांतून लाभांश देय होणार नाही आणि लाभांशाच्या कोणत्याही रकमेवर कंपनीला व्याज द्यावे लागणार नाही.

**नफा, केव्हा निव्वळ नफा समजावयाचा.**

१०८. कंपनीच्या निव्वळ नफ्यासंबंधात मंडळाने केलेली घोषणा अंतिम असेल.

१०९. मंडळाला, कंपनीच्या स्थितीनुसार देणे योग्य वाटेल असे अंतरिम लाभांश सदस्यांना वेळोवेळी देता येतील.

११०. ज्यांवर कंपनीचा धारणाधिकार असेल असे कोणतेही लाभांश मंडळाला ठेवून घेता येईल व असा धारणाधिकार ज्या संबंधात अस्तित्वात असेल अशा ऋणांच्या, दायित्वांच्या अथवा अभिसंकेतांच्या रकमांची पूर्ती करण्यासाठी त्यांचा वापर करता येईल.



**विवक्षित मत्त्यांसंबंधात देय असलेला लाभांश अथवा बोनस.**

१११. लाभांश घोषित करणाऱ्या कोणत्याही सर्वसाधारण सभेमध्ये असा अधिलाभांश विविक्षित मत्तांचे पूर्णपणे किंवा त्यांच्या काही भागाचे वाटप करून आणि विशेषकरून कंपनीचे भरणा झालेले शेअर्स, ऋणपत्रे अथवा ऋण रोखे देऊन किंवा कोणत्याही इतर कंपनीचे भरणा झालेले शेअर्स, ऋणपत्रे अथवा ऋणरोखे देऊन किंवा अशा प्रकारच्या एका किंवा अनेक मार्गांनी वाटप करून देण्याचा ठराव करू शकेल; कोणत्याही सर्वसाधारण सभेला असा ठराव करता येईल की, कोणत्याही रकमांच्या गुंतवणुका, किंवा राखीव निधीमध्ये जमा करण्यात आलेल्या असतील अशा कंपनीच्या, नफ्याच्या अविभाजित नफ्याचा भाग असणाऱ्या किंवा कंपनीच्या हाती असलेल्या अथवा लाभांश म्हणून वाटप करण्यासाठी उपलब्ध असलेल्या अथवा शेअर्स व्रिकीला काढण्याच्या परिणामी मिळालेल्या; व शेअर अधिमूल्य लेखात जमा करण्यात आलेल्या रकमा, भांडवल म्हणून हिशेबात घेण्यात याव्यात व भांडवल म्हणून त्याबाबत शेअरधारक हक्कदार आहेत असे मानून हक्कानुसार त्यांच्यामध्ये त्या रकमांचे वाटप करण्यात यावे आणि अशा भांडवल म्हणून मानण्यात आलेला सर्व निधी किंवा त्याचा भाग, या शेअरधारकांच्या वतीने कंपनीचे विक्रीस न काढलेल्या कोणत्याही शेअरांच्या रकमा भरण्यासाठी वापरण्यात यावा आणि असे विक्रीस न काढलेले पूर्ण भरणा करण्यात आलेल्या शेअर्सचे ते ज्या प्रमाणात लाभांश मिळण्यास पात्र आहेत त्या प्रमाणात त्यांच्यामध्ये वाटप करण्यात यावे व शेअरधारक, त्यांच्या उक्त भांडवलीकृत रकमेतील त्यांच्या हितसंबंधाची पूर्णपणे पूर्ति करण्यात आलेली आहे अशा प्रकारे ते शेअर्स स्वीकारतील. या नियमाखालील कोणत्याही ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठी, वाटपासंबंधात उद्भवणारी कोणतीही अडचण, इष्ट वाटेल अशा प्रकारे मंडळाला सोडवता येईल आणि विशेषेकरून त्यास आंशिक प्रमाणपत्रे देता येतील व वाटप करण्यासाठी कोणत्याही विशिष्ट मत्तांचे मूल्य निश्चित करता येईल व अशा प्रकारे निश्चित करण्यात आलेल्या मूल्यांच्या आधारे कोणत्या सदस्याला किती रोख द्यावयाची हे निश्चित करता येईल. तसेच सर्व व्यक्तींच्या हक्कांच्या रकमा समायोजित करण्यासाठी रु. १ चा भाग हिशेबात घेण्यात येणार नाही आणि मंडळाला इष्ट वाटेल त्याप्रमाणे मंडळ अधिलाभांश किंवा भांडवलीकृत निधी यासाठी हक्कदार असलेल्या व्यक्तींकरिता विशिष्ट मत्तासंबधातील अशी कोणतीही प्रकरणे अशा न्यासाच्या विश्वस्तांकडे निहित करील, ज्याबाबतीत कायद्याने आवश्यक असेल त्या प्रकरणी अधिनियमाच्या कलम ७५ अन्वये उचित संविदा सादर करण्यात येईल आणि अधिलाभांश किंवा भांडवलीकृत निधीसाठी पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तींच्या वतीने स्वाक्षरी करण्यास कोणत्याही व्यक्तींची नेमणूक मंडळाला करता येईल व अशी नेमणूक परिणामकारक असेल.

**हस्तांतरणांचा परिणाम.**

११२. शेअरांचे हस्तांतरण केल्यामुळे अशा हस्तांतरणानंतर आणि हस्तांतरण केलेल्या शेअरांची नोंदणी करण्यापूर्वी त्या शेअरांवर घोषित करण्यात आलेल्या कोणत्याही लभांशासंबंधातील हक्क त्या शेअरांबरोबर हस्तांतरित होणार नाही.

**विवक्षित प्रकरणी (रकमा) ठेवून घेणे.**

११३. अधिनियमाच्या उपबंधांस अधीन राहून, मंडळ, संक्रामण खंड (नियम २४) च्या अनुसार ज्या शेअरच्या संबंधात कोणतीही व्यक्ती सदस्य होण्यास हक्कदार असेल, अशा शेअरांवरील लाभांशाची जी रक्कम त्या खंडाच्या अनुसार हस्तांतरित करण्यास कोणतीही व्यक्ती हक्कदार असेल अशी व्यक्ती अशा शेअरच्या संबंधात सदस्य होईपर्यंत अथवा ते यथोतिचरीत्या हस्तांतरीत करीपर्यंत, अशी लाभांशाची रक्कम ठेवून घेऊ शकेल.

**संयुक्त शेअरधारकांना लाभांश.**

११४. संयुक्त शेअरधारक म्हणून नोंदणी केलेल्या वेगवेगळ्या व्यक्तीपैकी कोणतीही एक व्यक्ती, सर्व लाभांशासाठी आणि अशा शेअरच्या बाबतीत लाभांश म्हणून मिळालेल्या प्रदानासाठी पावत्या देऊ शकेल.

**लाभांश रोख रकमेत असावयाचे.**

११५. नियम १११ आणि ११३ मध्ये अन्यथा केलेल्या गोष्टी व्यतिरिक्त रोख रकमे व्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रकारे अधिलाभांश देय असणार नाही आणि तो घोषित केल्याच्या दिवसापासून बेचाळीस दिवसांच्या आत देण्यात येईल.

**डाके द्वारे देणे.**

११६. अन्यथा निर्देशित केले नसेल तर कोणताही लाभांश, सदस्याच्या किंवा हक्कदार व्यक्तीच्या किंवा संयुक्त शेअरधारकांच्या बाबतीत नोंदवहीत ज्याचे नाव पहिले असेल त्याच्या नोंदलेल्या पत्त्यावर डाकेद्वारा पाठवलेल्या चेकने किंवा अधिपत्राने देण्यात यावा आणि अशा रीतीने पाठवलेला प्रत्येक चेक किंवा अधिपत्र ज्या व्यक्तीला पाठवायचे असेल त्या व्यक्तीच्या नावे देण्यात येईल.

**लाभांशाची सूचना.**

११७. कोणताही लाभांश घोषित केल्याची सूचना - मग ती अंतरिम असो वा अन्यथा आत यापुढे उपबंधित केले असेल त्या रीतीने नोंदणी केलेल्या शेअरधारकांना देण्यात येईल.

## बावीस. लेखे

**ठेवावयाचे लेखे.**

११८. कंपनी,

(अ) कंपनीला मिळालेल्या व तिने खर्च झालेल्या सर्व रकमा आणि ज्याच्यासंबंधात जमा व खर्च होत असतो अशा सर्व बाबी;

(ब) कंपनीने केलेले मालाची सर्व विक्री आणि खरेदी;

(क) कंपनीची मत्ता व दायित्वे; यांच्या संबंधित योग्य ती लेखा पुस्तके ठेवण्याची व्यवस्था करील.

**लेखा पुस्तकांची तपासणी.**

११९. लेखा पुस्तके कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयात किंवा मंडळाला योग्य वाटेल अशा इतर ठिकाणी ठेवण्यात येतील आणि कामाच्या वेळात संचालकांना तपासणीसाठी ती खुली असतील.

**सदस्यांकडून तपासणी**

१२०. मंडळ, वेळोवेळी कंपनीचे लेखे आणि पुस्तके कोणत्या परिस्थितीत आणि विनियमाच्या अनुसार व कोणत्या मर्यादेपर्यंत व कोणत्या वेळी आणि ठिकाणी सदस्यांना (संचालक नसताना) तपासणी करता खुली असतील ते निश्चित करील



आणि विधिद्वारा प्रदान करण्यात आला असेल किंवा मंडळाने किंवा कंपनीच्या सर्वसाधारण सभेतील ठरावाद्वारे प्राधिकृत करण्यात आले असेल त्या व्यतिरिक्त (संचालक नसलेल्या) कोणत्याही सदस्यास कंपनीचा कोणताही लेख किंवा पुस्तक किंवा कागदपत्र तपासण्याचा कोणताही हक्क असणार नाही.

**वार्षिक लेखा व ताळेबंद.**

१२१. मंडळ, कंपनीची निगमित झाल्यानंतर १८ महिन्यांच्या नंतरची नसेल अशा एखाद्या तारखेस आणि त्यानंतर प्रत्येक वित्तीय वर्षी वर्षातून निदान एकदा पहिल्या लेख्याच्या बाबतीत कंपनी निगमित झाल्यापासूनचा आणि अन्य कोणत्याही प्रकरणी अधिनियमाच्या कलम १६६ व २१० च्या उपबंधाच्या अनुसार सभेच्या दिनांकाच्या ६ महिन्यांपेक्षा अगोदरची होणार नाही अशा तारखेपर्यंत केलेल्या मागील लेखापासूनचा ताळेबंद आणि नफा-तोटा लेखा वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये कंपनी पुढे ठेवील.

**मंडळाचा वार्षिक अहवाल.**

१२२. मंडळ, कंपनीच्या व्यावहारिक स्थितीसंबंधी एक प्रतिवेदन तयार करील व प्रत्येक ताळेबंदास जोडील आणि ज्या रकमेची ते शिफारस करील अशी रक्कम अधिलाभांश म्हणून देण्यात येईल व कोणतीही रक्कम राखीव निधीत, सर्वसाधारण राखीव निधीत किंवा राखीव लेख्यामध्ये घालण्याचे ठरवले असेल तर ती ताळेबंदामध्ये विनिर्देशपूर्वक दर्शवण्यात यावी किंवा एखाद्या राखीव निधीत, सर्वसाधारण राखीव निधीत किंवा राखीव लेख्यामध्ये नंतरच्या ताळेबंदात विनिर्देशपूर्वक दर्शवण्यात यावी. मंडळाकडून सही करण्यास प्राधिकृत करण्यात आले असेल तर मंडळाच्या वतीने संचालक मंडळाचा अध्यक्ष या अहवालावर सही करील.

**नफा व तोटा लेख्याचा आशय.**

१२३. अधिनियमाच्या कलम २११ चे उपबंध आणि त्यात निर्दिष्ट केलेली अनुसूची सहाच्या अधीन, नफा व तोटा पत्रकात प्राप्तीची एकूण रक्कम, ज्या विविध मार्गांनी मिळालेली असेल ती निरनिराळी दाखवून व अत्यंत सोयीस्कर शीर्षकाखाली क्रमवार लावून आणि एकूण खर्चाची रक्कम, आस्थापना, वेतने आणि इतर तत्सम बाबींचा खर्च वेगवेगळा नमूद करून, दर्शवण्यात येईल. वार्षिक उत्पन्नामधून रास्तपणे करण्याजोगी खर्चाची प्रत्येक बाब हिशेबात धरण्यात येईल, त्यामुळे नफा व तोट्याची योग्य शिल्लक सभेपुढे ठेवता येईल आणि वस्तुत: अनेक वर्षांमध्ये जो खर्च करता येणे शक्य असेल असा कोणताही खर्च कोणत्याही एकाच वर्षात केला असेल तर त्या बाबतीत अशा बाबीच्या संपूर्ण रकमेची नोंद, अशा खर्चाच्या रकमेमधील केवळ काही रक्कमच वार्षिक उत्पन्नाच्या रकमेतून का खर्च करण्यात आला त्यासंबंधीचे कारण नमूद करून, करण्यात येईल.

**ताळेबंद नफा, नफा व तोटा लेखा सदस्यांकडे पाठवावयाचा.**

१२४. कंपनी, लेखापरीक्षकाच्या अहवालाच्या प्रतीसह अशा ताळेबंदाची आणि नफा व तोटा पत्रकाची प्रत, ताळेबंद व नफा आणि तोटा पत्रक ज्या सभेमध्ये सदस्यांपुढे मांडावयाचे असेल त्या सभेपूर्वी निदान चार दिवस आधी, या नियमावलीच्या अनुसार नोटीसा ज्या पद्धतीने पाठवण्यात येतील त्याच पद्धतीने कंपनीच्या प्रत्येक सदस्यास त्याच्या नोंदणी केलेल्या पत्त्यावर पाठवील.

**अधिनियमाच्या कलम २०९ ते २२२ चे मंडळाने अनुपालन करावयाचे.**

१२५. मंडळ सर्व बाबतीत अधिनियमाचे कलम २०९ व २२२ यांच्या उपबंधाचे किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या त्याच्या कोणत्याही संविधान फेरफाराचे अनुपालन करील.

## तेवीस. लेखापरीक्षा

**लेख्यांची प्रत्येक वर्षी लेखापरीक्षा करणे.**

१२६. प्रत्येक वित्तीय वर्षी निदान एकदा, कंपनीच्या लेखांची तपासणी करण्यात येईल आणि ताळेबंधाच्या नफा व तोटा पत्रकाच्या अचूकतेविषयी एक किंवा अधिक लेखपरीक्षकाकडून खात्री करून घेण्यात येईल.

**लेखापरीक्षकांची नियुक्ती आणि त्यांचे पारिश्रमिक.**

१२७. कंपनीच्या लेखापरीक्षकांची नियुक्ती किंवा प्रतिनियुक्ती केंद्र सरकारकडून भारताचे नियंत्रक व महा लेखापरिक्षक यांच्या साह्याने करण्यात येईल आणि त्याचे/त्यांचे पारिश्रमिक, अधिकार व कर्तव्ये, अधिनियमाची कलमे २२४ ते २३३ यांच्या अनुसार विनियमित होतील.

**सभेत उपस्थित राहण्यासाठी लेखापरीक्षकांचे हक्क.**

१२८. कंपनीचे लेखापरीक्षक, त्यांनी तपासलेले किंवा प्रतिवेदित केलेले कोणतेही लेखे, ज्या कोणत्याही सर्वसाधारण सभेमध्ये मांडावयाचे असतील अशा कोणत्याही सभेची नोटीस मिळण्यास आणि सभेस उपस्थित राहण्यास हक्कदार असतील आणि लेखाच्या संबंधात त्यांना इष्ट वाटेल असे कोणतेही निवेदन अथवा स्पष्टीकरण ते करू शकतील.

**नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांच्या शक्ती.**

१२९. भारताच्या नियंत्रक व महा लेखापरीक्षकाला -

(अ) नियम १२९ अनुसार नियुक्त केलेल्या लेखापरिक्षकाने / लेखापरीक्षकांनी कंपनीच्या लेख्याची लेखापरीक्षा ज्या पद्धतीने करावयाची ती पद्धत निदेशित करण्याची आणि अशा लेखापरीक्षकाला/लेखापरीक्षकांना त्याच्या/त्यांच्या कामकाजाविषयी कोणत्याही बाबीसंबंधात सूचना देण्याचा;

(ब) ते स्वत: याबाबतीत प्राधिकृत करतील अशा व्यक्तीकडून/ व्यक्तींकडून कंपनीच्या लेखाची पुरवणी किंवा चाचणी लेखापरीक्षा करवून घेण्याची आणि अशा लेखापरीक्षेच्या प्रयोजनासाठी कंपनीचे सर्व लेखे, लेखा पुस्तके, प्रमाणके, दस्तऐवज आणि इतर कागदपत्र, सर्व वाजवी वेळी पाहण्यासाठी उपलब्ध करवून घेण्याची आणि नियंत्रक आणि महा लेखापरीक्षक सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निदेश देईल अशा व्यक्तीला किंवा व्यक्तींना आणि अशा नमुन्यामध्ये, अशा बाबींसंबंधीची माहिती अथवा अतिरिक्त माहिती अशा प्रकारे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यास भाग पाडण्याची, शक्ती असेल.



**लेखापरीक्षा अहवालांवरील नियंत्रक व महालेकापाल यांचे भाष्य व पुरवणी लेखापरीक्षा सर्वसाधारण सभेपुढे ठेवावयाचे.**

१३०. पूर्वोक्त लेखापरीक्षक, त्याच्या/त्यांच्या लेखापरीक्षा अहवालाची प्रत भारताचे नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांस सादर करील/ करतील. भारताचे नियंत्रक व महा लेखापरीक्षक यांना, त्यांना योग्य वाटेल अशा प्रकारे लेखापरीक्षा अहवालावर भाष्य करण्याचा किंवा पुरवणी लेखापरीक्षा जोडण्याचा अधिकार असेल. लेखापरीक्षा अहवालावरील कोणतेही असे भाष्य किंवा पुरवणी लेखापरीक्षा, कंपनीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये लेखापरीक्षा अहवाल ज्या पद्धतीने सादर करण्यात येतो त्याच पद्धतीने आणि त्याच वेळी सभेपुढे मांडण्यात येईल.

**वार्षिक अहवाल राज्य विधान मंडळापुढे ठेवावयाचा.**

१३१. राज्य शासन, कंपनीच्या कामकाजाचा व व्यवहाराचा वार्षिक अहवाल -

(अ) वार्षिक सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यासाठी ३ महिन्यांच्या आत तयार करण्यास भाग पडेल; आणि

(ब) असा अहवाल तयार झाल्यानंतर नियम १३१ मध्ये निर्दिष्ट केल्याप्रमाणे लेखापरीक्षा अहवाल व भाष्य किंवा पुरवणी लेखापरीक्षेच्या प्रतीसह राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहात ठेवण्यास भाग पाडेल.

**लेखा अंतिमरीत्या निश्चित झाला आहे हे केव्हा समजावयाचे.**

१३२. लेखापरीक्षेत झालेला व सर्वसाधारण सभेने मान्य केलेला मंडळाचा प्रत्येक लेखा त्यास मान्यता मिळाल्यानंतर पुढील ३ महिन्यांचे आत त्यामध्ये आढळलेला कोणताही दोष वगळता निर्णायक असेल. अशा कालावधीत असा कोणताही दोष आढळल्यास लेखामध्ये ताबडतोब सुधारणा करण्यात येईल आणि त्यानंतर तो निर्णायक ठरेल.

## चोवीस. राज्यपालांचे अधिकार

**राज्यपालांचे अधिकार**

१३३. ह्या नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरीही, राज्यपालांना वेळोवेळी, कंपनीची वित्तव्यवस्था, कामकाज किंवा व्यवहार यासंबंधी, त्यांना आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील आणि तशाच रीतीने असे निदेश बदलता येतील व ते विलोपित करता येतील. कंपनी हे निदेश ताबडतोब अंमलात आणील. अशा रीतीने काढलेले निदेश कंपनी ताबडतोब अंमलात आणील. राज्यपालांना विशेषकरून, -

(एक) राष्ट्रीय सुरक्षेच्या व खऱ्याखुऱ्या सार्वजनिक हिताच्या बाबी अंतर्भूत असतील अशा बाबींसंबंधातील कामकाज पार पाडण्यासाठी व त्यांचे पालन करण्यासाठी कंपनीला निदेश देणे;

(दोन) कंपनीची मालमत्ता व कार्य यासंबंधातील विवरणे, लेखे व सतर माहिती मागवणे, आवश्यक होईल तेव्हा वेळोवेळी मागवणे;

(तीन) कंपनीची पंचवार्षिक योजना, विकासाची वार्षिक योजना आणि कंपनीचे भांडवली अर्थसंकल्प मान्य करणे;

(चार) कंपनीच्या महसुली अर्थसंकल्पात, तुटीच्या बाबी असतील आणि शासनाकडून निधी मिळवून भरून काढण्याचे प्रस्तावित केले असेल तर, त्या मान्य करणे;

(पाच) विदेशी कंपन्यांचे सहकार्य अंतर्भूत असलेले जे करार कंपनीने करावयाचे ठरवले असेल अशा करारांना मान्यता देणे;

या शक्ती असतील.

## पंचवीस. नोटीस

सदस्यांवर नोटीस कशी द्यावयाची.

१३४. कंपनी कोणत्याही सदस्यास नोटीस, व्यक्तिश: किंवा त्याच्या नोंदलेल्या पत्त्यावर किंवा (जर त्याच्या नोंदलेला पत्ता नसेल तर) त्याने नोटीस पाठवण्यासाठी कंपनीला एखादा पत्ता दिलेला असेल तर त्या पत्त्यावर टपालाद्वारे पाठवून देऊ शकेल.

नोंदणीकृत पत्त्याचे ठिकाण नसलेया नोंदणीकृत शेअर धारण करणाऱ्याने पत्ता कळविणे.

१३५. नोंदणीकृत शेअर धारकाचे नोंदणीकृत पत्त्याचे ठिकाण नसेल तर अखेरच्या पूर्ववर्ती नियमाच्या अर्थानुसार, त्याचा नोंदणीकृत पत्ता म्हणून मानला जाईल असा पत्ता, तो, वेळोवेळी, कंपनीला लेखी कळवू शकेल.

जाहिरातद्वारे नोटीस केव्हा द्यावयाची.

१३६. एखाद्या सदस्याचा नोंदलेला पत्ता नसेल आणि त्याने त्याला नोटीस देण्यासाठी कंपनीला पत्ता दिला नसेल तर, कंपनीच्या नोंदणीकृत कार्यालयाच्या परिसरात प्रसृत होणाऱ्या एखाद्या वृत्तपत्रामध्ये त्याला उद्देशिलेली आणि प्रसिद्ध केलेली नोटीस, ज्या दिवशी अशी नोटिस (वृत्तपत्रात) प्रसिद्ध होईल त्याच दिवशी त्याला यथोचितरीत्या दिल्याचे मानण्यात येईल.

संयुक्त शेअर धारकांना नोटीस.

१३७. संयुक्त शेअर धारकांच्या बाबतीत शेअरच्या संबंधातील बाबतीत, नोंदवहीत ज्याचे नाव प्रथम आले असेल त्या शेअरच्या धारकाला नोटीस देऊन कंपनी, संयुक्त शेअर धारकांना नोटीस देऊ शकेल.

मयताच्या प्रतिनिधीला किंवा दिवाळखार सदस्याला कशी नोटीस द्यावी.

१३८. एखाद्या सदस्याचा मृत्यू झाल्याच्या किंवा तो नादारी ठरल्याच्या परिणामी शेअरकरिता हक्कदार असणाऱ्या व्यक्तींना, त्यांच्या नावाने किंवा मयताचा प्रतिनिधी किंवा नादार व्यक्तीची अभिहस्तांकिनी अशी त्यांची नामाभिदाने अथवा अशा प्रकारच्या अन्य वर्णनाद्वारे त्यांना उद्देशून लिहिलेले टपालखर्च आगाऊ दिलेले पत्र असा हक्क सांगणाऱ्या व्यक्तींनी या कारणास्तव दिलेल्या पत्त्यावर (कोणताही पत्ता दिला असल्यास) पाठवून किंवा (असा पत्ता दिला जाईपर्यंत), (सदस्याचा) मृत्यू घडला नसता किंवा तो नादार ठरला नसता तर ज्या कोणत्याही प्रकारे नोटीस देण्यात आली असती त्या कोणत्याही अशा प्रकारे अशी नोटीस देऊन, कंपनी, नोटीस देऊ शकेल.



सर्वसाधारण सभेची नोटीस कोणास द्यावयाची.

१३९. प्रत्येक सर्वसाधारण सभेची नोटीस, यात यापूर्वी प्राधिकृत केलेल्या रीतीने, (अ) ज्यांनी, त्यांना नोटीस देण्यासाठी त्यांचा नोंदलेला पत्ता नसल्याने पत्ता दिलेला नसेल अशा सदस्यांव्यतिरिक्त कंपनीच्या प्रत्येक सदस्यास आणि तसेच (ब) एखादा सदस्य, तो जर मृत्यु पावला नसता अथवा नादार ठरला नसता तर सभेची जी नाटीस मिळण्यास हक्कदार ठरला असता अशी नोटीस त्याच्या मृत्युच्या किंवा तो नादार ठरल्याच्या परिणामी, शेअरच्या संबंधात हक्कदार ठरणाऱ्या प्रत्ये व्यक्तीस, मात्र अशा मृत्युचे अथवा नादारीचे वृत्त कंपनीला यथोचितरीत्या कळवण्यात आलेले असले पाहिजे (क) विधीच्या प्रवर्तनामुळे, हस्तांतरणामुळे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे कोणत्याही शेअरच्या संबंधात हक्कदार ठरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला देण्यात येईल व अशी प्रत्येक व्यक्ती, अशा शेअरच्या संबंधातील प्रत्येक नोटीशीस बद्ध असेल (आणि अशी नोटीस), तिचे नाव व पत्ता आणि शेअरमधील हक्क यासंबंधी कंपनीला कळवण्यास येण्यापूर्वीच, ज्या व्यक्तीकडून अशा शेअरमधील हक्क तिला प्राप्त झाले असतील त्या व्यक्तीला यथोचितरीत्या देण्यात येईल.

हस्तांतरिती इत्यादींनी आगऊ नोटीशीद्वारे बद्ध असणे.

नोटीशीवर सही कशी करावी.

१४०. कंपनीने द्यावयाच्या कोणत्याही नोटीशीवरील सही लेखी किंवा छापील असावी.

नोटीशीचा कालावधी कसा मोजावा.

१४१. ठराविक दिवसाची नोटीस किंवा अन्य कोणत्याही कालावधीपर्यंतची नोटीस देणे आवश्यक असेल तेव्हा, अन्यथा तरतूद करण्यात आली नसेल तर नोटीशीच्या बजावणीचा दिवस अशा दिवसांमध्ये किंवा इतर कालावधीमध्ये जमेस धरण्यात येईल.

## सव्वीस. परिसमापन

परिसमानता नंतरचे मत्तांचे वाटप.

१४२. कंपनी परिसमापिक करावयाची असेल आणि सदस्यांमध्ये सदस्य या नात्याने वाटून देण्यासाठी उपलब्ध असलेली मत्ता, संपूर्ण भरणा केलेल्या भांडवलाची परतफेड करण्यास अपुरी असेल तर, अशी मत्ता, त्यांनी परिसमापनाच्या प्रारंभाच्या वेळी धारण केलेल्या शेअर्सवर अनुक्रमे भरणा केलेल्या अथवा भरणा करणे आवश्यक होते अशा भांडवलाच्या प्रमाणातच शक्यतोवर सदस्यांना तोटा सोसावा लागेल अशा प्रकारे वाटून देण्यात येईल. आणि परिसमापनाच्या वेळी सदस्यांमध्ये वाटपासाठी उपलब्ध असलेली मत्ता परिसमापनाच्या प्रारंभाच्या वेळी व भरणा केलेल्या संपूर्ण भांडवलाच्या परतफेडीच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, ती अधिक रक्कम, परिसमापनाच्या प्रारंभाच्या वेळी त्यांनी धारण केलेल्या शेअर्सवर अनुक्रमे भरणा केलेल्या किंवा भरणा करणे आवश्यक असलेल्या भांडवलाच्या प्रमाणात, सदस्यांमध्ये वाटून देण्यात येईल. परंतु हा खंड, विशेष अटी व शर्तींवर दिलेल्या शेअर धारकांच्या हक्कांस बाध न पोहोचवणारा असेल.

## सत्तावीस. गुप्तता विषयक खंड

गुप्तता विषयक खंड

१४३. कोणताही सदस्य, कंपनीचे कामकाज चालवण्याशी संबंधित आणि मंडळाच्या मते, कंपनीच्या सदस्यांच्या हितसंबंधाच्या दृष्टीने लोकांना कळविणे अनिष्ट असेल अशा, व्यापारातील इंगित होऊ शकेल, गुप्त स्वरूपाच्या कामकाजाचे

व्यापारी सदस्य होऊ शकेल अशा कोणत्याही बाबीचा कंपनीच्या व्यापारासंबंधातील कोणताही तपशील उघड करण्यास अथवा त्यासंबंधीची माहिती देण्यास भाग पाडण्यास, हक्कदार नसेल.

## अठ्ठावीस. क्षतिपूर्ति

क्षतिपूर्ती.

१४४. अधिनियमाच्या कलम २०१ च्या उपबंधाच्या अधीन राहून, कंपनीचे प्रत्येक संचालक, व्यवस्थापक, लेखापरीक्षक, सचिव आणि इतर अधिकारी किंवा कर्मचारी कंपनीकडून क्षतिपूरित होतील आणि असा अधिकारी किंवा कर्मचारी या नात्याने अथवा त्याची कर्तव्ये पार पडत असताना अन्य कोणत्याही प्रकारे त्याने कोणतीही संविदा केल्याने अथवा कृति किंवा गोष्ट केल्याने त्या कारणास्तव असा अधिकारी किंवा सेवक योग्य प्रकारे करील अथवा करण्यास दायी ठरेल अशा खर्चाच्या, तोट्याच्या आणि व्ययाच्या सर्व रकमा कंपनीच्या निधीमधून देणे हे मंडळाचे कर्तव्य असेल; आणि ज्या रकमेकरीता अशा प्रकारे क्षतिपूर्ति करण्यात आली असेल त्या रकमेचा कंपनीच्या मालमत्तेवर ताबडतोब धारणाधिकार राहील आणि इतर सर्व हक्कमागण्यांवर त्या रकमेस इतर सदस्यांच्या जोडीनेच अग्रक्रम असेल.

संचालकांची वैयक्तिक जबाबदारी

१४५. कंपनीचा कोणताही संचालक किंवा इतर अधिकारी हा, कंपनीच्या कोणत्याही इतर संचालकाने किंवा अधिकाऱ्याने केलल्या कृती, जमा रकमा, हलगर्जीपणा किंवा कसूर याबद्दल किंवा कोणत्याही मिळकतीत अथवा तदनुरूप कृतीमध्ये सहभागी होण्याबद्दल अथवा कंपनीसाठी अथवा कंपनीच्या वतीने मंडळाच्या आदेशांच्या अनुसार संपादन केलेल्या कोणत्याही मालमत्तेतील हक्क अपुरा अथवा सदोष असल्याने कंपनीला कोणताही तोटा झाला असेल अथवा खर्च करावा लागला असले तर त्याबद्दल, किंवा कंपनीचा पैसा ज्या कोणत्याही रोख्यांमध्ये अथवा रोख्यांवर गुंतवण्यात येईल अशा रोख्यांच्या रकमा अपुऱ्या अथवा तुटीच्या असल्याबद्दल किंवा कोणतांही पैसा, रोखे किंवा चीजवस्तू ज्या व्यक्तीकडे ठेवण्यात येतील ती व्यक्ती दिवाळखोर, नादार निघाल्यास त्यामुळे किंवा नजरचुकीमुळे झालेला अन्य कोणताही तोटा, हांनि, किंवा ओढवलेली आपत्ती वा अन्य काही, याबद्दल तो त्याची स्वतःच्या पदाची अथवा यासंबंधातील कामे पार पाडत असतांना त्याचा स्वतःचाच अक्षम्य हलगर्जीपणा झालेला नसेल, किंवा त्याने बुध्दया चूक केलेली नसेल, गंभीर अपकरण केलेले नसेल, हेतुपुरस्सर कर्तव्यभंग अथवा विश्वासघात केलेला नसेल तर तो दायी ठरणार नाही.

आम्ही, ज्यांची नावे व पत्ते नमूद करण्यात आली आहेत अशा निरनिराळ्या व्यक्ती या अधिसंघ नियमावलीच्या अनुसार कंपनी म्हणून एकत्रित येऊ इच्छितो व कंपनीच्या भांडवलातील आमच्या नावाच्यासमोर अनुक्रमे देण्यात आलेला, शेअर्स आम्ही घेऊ इच्छितो.



| अनु. क्रमांक | भागधारकाचे नाव, पत्ता वर्णन आणि व्यवसाय | प्रत्येक भागधारकाने घेतलेल्या सममूल्य भागांची संख्या | भागधारकाची सही | साक्षीदाराचे नाव पत्ता, वर्णन व व्यवसाय आणि त्यांची सही |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | महाराष्ट्राचे राज्यपाल प्रतिनिधी : | | | |
| १. | श्री. वसंत,वडिलांचे नाव श्री. बलवंत रामराव मंडलेकर, २०/५, 'रवी' जुहू सोसायटी, दौलताबाद देसाई नगर, जुहू रस्त्यालगत, सांताक्रुज (पश्चिम), मुंबई-४०० ०५४. सचिव महाराष्ट्र शासन, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व पर्यटन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२. | नऊ (९) | सही/- (व्ही. बी. मंडलेकर) | श्री. राम वडिलांचे नाव श्री. नारायण हरि गवाले ६८६, मंजुळा निवास, १६ वा रस्ता, खार, मुंबई - ४०० ०५२. संचालक (चित्रपट), महाराष्ट्र शासन. |
| २. | श्री. दामोदर, वडिलांचे नाव श्री. काशिनाथ वासुदेव केंकरे, २३, कला नगर, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१, संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, | एक (१) | सही/- (डी. के. केंकरे) | श्री.ज्ञानेश्वन, वडिलांचे नाव श्री. मारुतीराव रामचंद्र ढगे, ४१, मंगेश सदस, लेडी जमशेटजी मार्ग, शिवाजी पार्क, मुंबई - ४०० ०२८. |

मुंबई, दिनांक २६ सप्टेंबर १९७७.

रजिस्टर्ड ऑफिस : 'फिल्म सिटी', गोरेगाव (पूर्व), मुंबई ४०० ०६५.
फोन नं. : ८४० १५३३, ८४० १७५५, ८४० ०४६९. फॅक्स : ८४० ०७३४

Printed by : Sonali Printers, Khar (E.), Mumbai - 51.